
वा.वा. ६६१

म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय : वा.वा.
दा. क्र. ६६१

BVBK-0400961
BVBK-0400961



# बुडलेला करंडक

म. वि. सोवनी

( द लॉस्ट कास्केटचे रूपांतर )

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
[illegible]
दा. क्र. ९६१ दिनांक .....
विषय कि२।२ क्र. ४५८

मूल्य रुपये पाच फक्त

BVBK-0400961

नितीन प्रकाशन, पुणे ३०.

प्रकाशिका
सौ. सुधा वसंत गोगटे
नितीन प्रकाशन
११८२ सदाशिव पेठ,
पुणे ३०

*

प्रथमावृत्ती-विजयादशमी १९७८

*

सर्वाधिकार प्रकाशिकेकडे

*

मुद्रक
ज. ता. गायकवाड
मायबोली प्रिन्टर्स
४०५ नारायण पेठ
पुणे ३०

## प्रास्ताविक

प्रिं. मायकेल मॅकमिलन यांनी लिहिलेल्या The Lost Casket या एका छोटया इतिहासकथेचे प्रदीर्घ रूपांतर मी ' लुटलेला करंडक ' या नावाने पुस्तकरूपाने येथे सादर केले आहे.

प्रिं. मॅकमिलन हे गेल्या शतकात मुंबईच्या एल्फिन्स्टन महाविद्यालयाचे प्राचार्य व इतिहास आणि इंग्रजी या विषयांचे प्राध्यापक म्हणून काम करीत होते. त्यांचा इतिहासाचा व्यासंग वाखाणण्यासारखा होता. भारतीय इतिहास हा त्यांचा खास आवडीचा विषय. सूक्ष्म निरीक्षण आणि तरल कल्पनाशक्ती यांच्या बळावर त्यांनी कित्येक भारतीय इतिहासकालीन कथांची यशस्वी उभारणी केली आहे. त्यांच्या कथा सत्यकथा नव्हेत, काल्पनिकच आहेत. परंतु स्थलकालाची अत्युत्कट जाणीव त्यांनी सांभाळल्यामुळे त्या मूर्तिमंत सत्यच वाटू लागतात. ही जाणीव आणि सत्यासत्यतेचे हे अवधान एतद्देशीय लेखकांनासुद्धा पेलवत नाही ह्या वस्तुस्थितीवर मॅकमिलन यांच्या सारख्या एका परकीय लेखकाचे यश अधिकच उजळून दिसावे यात नवल नाही. त्यांच्या ' In Wild Maratha Battles ' या पुस्तकावर मोहून जाऊन गेल्या पाऊणशे वर्षात कै. आचार्य अत्र्यांसारख्या अनेक लेखकांनी आपापल्या परीने त्याची भाषांतरे केली ही एकच गोष्ट प्रिं. मॅकमिलन यांच्या यशस्वितेचे गमक ठरविण्यास पुरेशी आहे.

The Lost Casket ही लघुकथा मी पहिल्यानेच वाचली तेव्हा मी सुद्धा असाच मोहून गेलो होतो. शालापत्रक मासिकाच्या १९५८ सालच्या दिवाळी अंकात मी ' हरविलेला करंडक ' या नावाने तिचा अनुवाद प्रसिद्ध केला, तो त्यावेळी अनेकांना आवडला होता. एक साहस-कथा म्हणून ही कथा लोकांना जेवढी आवडली त्यापेक्षाही शिवकालीन वातावरणाच्या प्रभावी चित्रणामुळे त्यांना ती जास्त आवडली. या अनुभवामुळेच नितीन प्रकाशनाचे संचालक श्री. गोगटे यांना, कुमारांसाठी एक दीर्घकथा लिहून देण्याचे मी मान्य केले तेव्हा माझ्या डोळ्यांसमोर हीच कथा पुन्हा उभी राहिली. या छोटया कथेची लांबी वाढवण्यासाठी मला तपशिलाची बरीच भर घालावी लागली. काही किरकोळ फेरफारही करावे लागले. तथापि लेखकाची मूळ कल्पना इमान राखून मी जशीच्या तशीच ठेवली आहे. लेखकाचे रंगवलेल्या मूळ घटनांच्या ऐतिहासिक सत्यतेबद्दल संदेह आहेत. त्यात सत्याचा काहीसा अपलाप झालेला आहे हे इतिहासाच्या चिकित्सक व व्यासंगी वाचकाला उमगेलही; परंतु हा निर्भेळ इतिहास नव्हेच, तर केवळ ऐतिहासिक पार्श्वभूमी वरची एक कल्पित कथा आहे हे मान्य केले तर हा सत्यालाप खचित क्षम्य ठरतो. निदान मॅकमिलनसारख्या शतकापूर्वीच्या इंग्रज लेखकाच्या बाबतीत तर तो निःसंशयपणे क्षम्य ठरला पाहिजे.

ही दीर्घसाहसकथा कुमार वाचकांना आवडेल अशी आशा आहे.

१ जुलै, १९७५. ] [—म. वि. सोवनी.

प्रकरण पहिले

## नव्या जीवनाची वाटचाल

" अॅहॉय ! " " अॅहॉय ! " डोलकाठीच्या टोकावरून ' फ्लॅग मास्टर ' ने जोरात आरोळी दिली आणि आमच्या जहाजावर क्षणभरातच गडबड दिसू लागली. जमीन दिसू लागल्याचीच ती आरोळी होती. मी पूर्व क्षितिजाकडे चमकून पाहिले. अनेक गलबतांच्या उंचच उंच डोलकाठया उभारलेली किंवा गुंडाळलेली शिडे अगदी अस्पष्ट का होईना पण त्या बाजूला हारीने दिसू लागली होती. अवध्या तासा दोन तासांत आम्ही किनाऱ्याला लागणार हा त्याचा अर्थ होता. " सु-र-त ! " आमच्या मुक्कामाचे अखेरचे ठिकाण. माझ्या छातीत धडधड सुरू झाली. काळजाचे ठोके चुकू लागले. अशा निराशेच्या दोलायमान अवस्थेत माझे मन गटांगळया खाऊ लागले. मी एकाएकी अस्वस्थ झालो.

सुरत ! माझ्या जीवनाचे एक पर्व. आयुष्याच्या एका नव्या दालनात टाकले जाणारे पहिले पाऊल. एक सर्वस्वी अज्ञात असणाऱ्या जगातील माझा पुनर्जन्मच. भविष्याच्या पोटात काय आहे कोणास ठाऊक ! ज्यांच्या शब्दाच्या आधारावर मी माझे आजवरचे सारे आयुष्य मागे टाकून इथे येतो आहे त्या चार्ल्स वेस्ले यांच्याशी माझे जमेल काय ? का

त्यांच्याकडूनही हकालपट्टीच वाट्याला येणार आहे ? माझ्या या देहाची अखेर माझ्या इंग्लंडच्याच भूमीवर व्हावयाचे माझ्या नशिबात आहे, का मी इंडियाच्याच कोठल्यातरी दफनभूमीत कायमचा विसावणार आहे का आणखी कुठलातरी भूप्रदेश मला कुशीत घेणार आहे ? सारेच अज्ञात. सारेच अतर्क्य ! अशा काहीशा चमत्कारिक विचारांची गुंतागुंत माझ्या मनात तयार होऊ लागली.

पण हा चाललेला कोलाहल धीराने माझा मीच निपटून काढला. मनाला बजावले, " अरे, आजवर कधी तू अशी उगाचच फिकीर करत बसला होतास काय ? तुझी वाटचाल, तुझा प्रवास, तू स्वत.च्याच हिमतीवर बेगुमानपणाने करीत आला आहेस ना ? तेव्हा कुठे नव्हता तो डरपोकपणा आताच तुला शिवला काय ? आणि गड्या तू जर असे भेकडपणाने हातपाय गाळून बसलास तर तुझे सांत्वन करायला कोणी आहे काय ? तुझ्याकडे लक्ष द्यायला वेळ आहे कोणाला ? जगाला काय इतर उद्योग थोडे आहेत की ते सोडून तुला थोपटायला त्याने धावून यावे ? तुला ना घर ना दार ! ना आई ना बाप ! पोरका ! पोरका तू ! ! तुला हे नखरे करून कसे चालेल ? तुझी तुलाच हिंमत धरायला हवी. " हिंमत मर्दा तो मदत खुदा " हे तुला माहीत आहे ना ?

होय ! आईबाप नसलेला, आसरा निवारा नसलेला अगदी पोरका असाच मी होतो. आईवडिलांच्या स्वर्गीय प्रेम वेलीवर उमललेले एक फूल म्हणजे मी. पण समाजाला ते प्रेम मान्य नव्हते. त्याने ती वेल उपटून टाकली आणि फुलाला फुलण्यासाठी वा सुकण्यासाठी तसेच जिवंत ठेवले. थोडक्यात का होईना माझी कहाणी मला इथे सांगितली पाहिजेच.

माझ्या वडिलांचे नाव मायकेल. टॉमस मायकेल. एक उमद्या मनाचा कलावंत. देवानं त्यांच्या बोटांत असं अजब सुरांचे ज्ञान भरून ठेवले होते की बासरी असो, गिटार असो वा दिलरुबा असो त्यांच्या हातातून त्या त्या वाद्यांवरून ओघळणाऱ्या स्वरमालिका ऐकल्या की सारे बेभान होऊन जात. निदान माझी आई तरी त्यांच्या या जादूवरच भुलली हे खास. वडील त्यावेळी स्कॉटलंड मधील डेव्हनशायर या छोटयाशा गावी राहत. गाव कसले अगदी खेडेच होते ते. उपजीविका तरी चालणार कशावर ? पण टॉमस मायकेल हे तिथल्या चर्चमध्ये काहीबाही काम करीत. मुख्यतः उपासना संगीत वाजविण्याचे त्यांचे काम असे. ते मंदिराची इतर लहानसहान कामे करीत. रात्रीच्या वेळी करमणुकीकरिता कोठे शाहिरी 'फड पडला की माझ्या वडिलांना तेथे मुद्दाम आमंत्रून नेले जाई. त्यांच्या शेरशायरीविना बैठक पुरी व्हायचीच नाही. गावातल्या तरुणांना कधीमधी नाटके करण्याची हुक्की येई तेव्हाही माझ्या वडि-लांच्यावाचून तेथले पान हलत नसे. थोडक्यात म्हणजे शांतपणाने जीवन व्यतीत करणाऱ्या स्कॉटलंडमधील एका छोटयाशा खेडेगावात टॉमस मायकेल हा एक गाण्याबजावण्याचा नाद असलेला कसबी पण तितकाच निरागस आणि भोळा कलाकार शांतपणाने आपले आयुष्य जगत होता. अशा वेळी माझी आई ही मुग्ध किशोरी असताना दैववशात् त्याच्या आयुष्यात आली आणि त्यांच्या आयुष्याने एक वेगळेच वळण घेतले.

माझी आई ही मध्य इंग्लंडमधल्या स्टोक्सच्या वेस्ले घराण्यातली. वेस्ले घराणे खानदानी. कर्तबगारीमुळे केवळ पंचक्रोशीतच गाजलेले नव्हते तर लंडनपर्यंतही त्यांच्या दबदबा पसरलेला होता. ही वेस्ले मंडळी

केव्हातरी हवापालट म्हणून काही दिवसांसाठी डेव्हनशायरला गेली होती. तिथल्या मुक्कामात टॉमस मायकेलचे कसब त्यांच्या नजरेस आले. त्या अनोख्या आणि अप्रतिम कलेने ती सर्वजण अगदी भारून गेली. हा गुणी कलावंत शहरात आला तर त्याच्या निरागस कलेला पैलू पडून ती केवढी तरी प्रभावित होईल या कल्पनेने त्यांनी टॉमसला त्याचे खेडेगाव सोडायला लावून आपल्या बरोबर आणले. त्यांच्या कुटुंबियांपैकीच एक अशी वागणूक त्याला दिली. प्रथम स्टोक्सला आणि पुढे कालांतराने त्यांच्या बरोबरच तो लंडनलाही आला. अवघ्या चारपाच महिन्यांचाच अवधी पण एवढयाशा कालात मेरी वेस्ले ही सोळा सतरा वर्षाची किशोरी आणि बावीस चोविशीचा टॉमस मायकेल यांची हृदयं केव्हा एकमेकांवर अनुरक्त झाली आणि प्रेमरज्जूंनी दोघांनाही किती बळकट एकत्रित जखडून ठेवले हे त्यांचे त्यांनाच कळलेही नाही.

लंडनला आल्यानंतर वेस्ले मंडळींच्याच साहाय्याने टॉमस मायकेलचे बस्तान जमले; जरा जम बसला आणि त्या दोघांनी विवाहाची परिस्फुटता करताच मात्र एकदम प्रचंड खळबळाट माजली. एका खानदान मुलीने एका हलक्या प्रतीच्या मुलाशी लग्न करणे म्हणजे केवढे महापाप. कलेच्या क्षेत्रात तो किती का श्रेष्ठ असेना पण सामाजिक प्रतिष्ठा म्हणून काही असते का नाही. छे ! छे ! हे होऊ देता कामा नये. वेस्ले घराण्याला हा कलंक, हा कालिमा लागता उपयोग नाही. हे थोपवलेच पाहिजे. सुमारे पंचवीस वर्षामागची ही गोष्ट आहे. चार्ल्स राजाची राजवट चालू होती. शहरात त्या वेळी प्युरिटन, एपिस्कोपेलियन अशा वेगवेगळया वादांचा आणि पंथाचा धुमाकूळ चालू होता.

टॉमस मायकेलला ह्या कुठल्याही वादाशी काही कर्तव्य नव्हते. पण तो मूळचा स्कॉटलंडचा–कॅथलिक चर्च मधील सेवक–त्यामुळे धूर्त वेस्ले मंडळींनी त्याच्यावर कॅथलिक शिक्का मारून त्याला राजाच्या शिपायां-कडून कैद करवले. तब्बल दहा महिने तुरुंगात राहून झिजलेल्या शरीराने आणि खंगलेल्या मनाने टॉमस मायकेल कसाबसा बाहेर आला. तो खचलेला होता पण त्याच्याकरिता खंबीर मनाने मेरी वेस्ले वाट पाहत होती. तो आल्यानंतर ती घरातून बाहेर पडून त्याला सामोरी झाली व ताबडतोब त्याच्याशी विवाहबद्ध झाली. वेस्ले घराण्याच्या प्रतिरोधाला न जुमानता त्यांनी आपलं घर उभारून स्थिर करायचे ठरवले होते.

पण त्यांना ते अशक्यप्राय झालं. एखादा घायाळ सावजाला कोंडीत पकडून, रान उठवून चारी बाजूंनी वेढून त्याला टोचून टोचून जशी त्याची शिकार केली जाते तशी या लोकांनी माझ्या वडिलांची शिकार केली. ह्या जीवघेण्या निर्दय शिकारीत माझे वडील टिकले नाहीत. ह्या साध्याभोळया तरुणाने दारूचा आश्रय घेतला. मद्याच्या धुंदीत इहलोकातील आपले सारे पाश विसरून, गुंगीत राहून तो कोठेही पडून राहू लागला. त्याची शुद्ध बुद्ध हरपली. मन पिचून गेले होते. शरीर पोखरून गेले होते. अशा अवस्थेत त्यांनी अचानक या जगातला अखेरचा श्वास घेतला.

वडील गेले त्या वेळी मी सारा तीन वर्षांचा होतो. आईचे वैवाहिक जीवन अवघ्या चार वर्षांचे. त्यांतही हाल आणि छळवाद याशिवाय तिच्या वाट्याला काही आले नव्हते. पण पतीचे प्रेम हा तिचा मोठा आधार होता. तिने पतीची कीव केली पण त्याचा राग केला नाही.

खंबीरपणाने अखेरपर्यंत ती पतीला साथच देत राहिली. आणि पति-निधनानंतर तर तिच्या माहेराविषयी ती अधिकच कठोर झाली. पुढची आठ नऊ वर्षं आम्ही किती हालअपेष्टांमध्ये घालवली याचा मी पाल्हाळ लावत नाही. परंतु त्या काळात आईने परिचारिकेचे, मोलकरणीचे, स्वयंपाकिणीचे, बेकरीत पीठ दळून देण्याचे अशी हलकी समजली जाणारी सर्व तऱ्हेची कामे केली आणि तीही स्वतःचा स्वाभिमान राखून—वेळ प्रसंगी मला दूर ठेवून तिला नोकऱ्या कराव्या लागत. अशा वेळी मला ती चर्चच्या पाद्रीबाबांच्या स्वाधीन करून जात असे. ती मला नेहमी म्हणत असे "मुला, तू कसाही वाग ! जे तुझ्या मनाला येईल ते खुशाल कर. मला त्याबद्दल कधीही वाईट वाटणार नाही. पण तीन गोष्टींची तू सतत जाणीव ठेव. कोणालाही लुबाडू फसवू नकोस. स्वाभिमान कधी सोडू नकोस आणि अधिकाचा लोभ धरू नकोस. ह्या तीन गोष्टी तू पाळल्यास तर तुला कधीही पश्चात्ताप करण्याची पाळी यावयाची नाही. या तिन्हीबाबत बाणेदारपणे ती सदैव वागत असे. नाही म्हटले तरी आईच्या प्रेमामुळे ह्या गोष्टी माझ्या मनात लहानपणापासून रुजल्याच.

ह्या साऱ्या कष्टमय जीवनाचा आणि अतिश्रमांचा आईच्या शरीरावर परिणाम होत होता. माझ्या वयाच्या अवघ्या बाराव्या वर्षी मला या जगात एकट्याला सोडून ती शांतपणे पतीच्या भेटीला निघून गेली. त्या दिवसा-पासून गेली दहा वर्षे सुकाणू नसलेल्या नावे प्रमाणे या अथांग जन-सागरावर हेलकावे खात खात मी माझी वाटचाल करीत आहे. हिशेब, गुणाकार, थोडेसे लिहिणे वाचणे, एवढे सर्वसामान्य रीतीप्रमाणे माझेही

शिक्षण लहानपणीच झाले होते पण त्यानंतर जगाच्या बाजारात मी सदैव शिकतच राहिलो. इंग्लंडमधले ते सारे दिवस फार धामधुमीचे होते. प्रजेने अखेर बंड करून चार्ल्स राजाला फाशी दिले त्यावेळी मी अवघा पाच वर्षांचा होतो. त्यानंतर लॉर्ड प्रोटेक्टर म्हणून जयजयकाराने गाजल्या गेलेल्या क्रॉम्वेलच्या कारकिर्दीत मी लहानाचा मोठा होत गेलो तो साऱ्या अस्थिरतेच्याच वातावरणात. अखेरीस दहा अकरा वर्षात लोक त्यालाही कंटाळले आणि नव्या चार्ल्स राजाला प्रजेने फ्रान्सहून बोलावून आणून गादीवर बसवले तेव्हा कोठे आता जरा स्थिरस्थावर झालेसे वाटू लागले होते. मला लढवय्या पेशाचे आकर्षण मुळीच नव्हते त्यामुळे सैन्यात प्रवेश मिळवण्याच्या खटपटीपासून मी दूरच राहिलो होतो. पण दुसरे काय करावे हे मला काहीच समजत नव्हते. जीवनाचा हा अस्थिरपणा,



बेचैनपणा मला अस्वस्थ करीत होता. अशाच एका क्षणी मी ‘ ईस्ट इंडिया कंपनी ’च्या नावाची पाटी वाचून चौकशीकरता आत गेलो होतो मनात एकदम विचार आला, “ जाऊ या इंडियाला.एका अज्ञात अशा दुनियेत द्यावे स्वतःला झोकून. ”

कंपनीला त्यावेळी मददगार रिक्रूटांची जरूरी असेच. त्यांनी सांगितले, “ कंपनीच्या नोकरीत केव्हाही रुजू होता येईल. कमीत कमी दहा वर्षाचे करारपत्र लिहून द्यावे लागेल. कंपनी सांगेल ते काम करावे लागेल. पगार इंडियात गेल्यानंतर सुरू होईल. इंडियाला जाण्याचा खर्च कंपनी करील. ” त्यानी आणखीही एक दोन पर्याय माझ्यापुढे ठेवले., “ स्वतःच्या खर्चाने तुम्ही केव्हाही जाऊ येऊ शकाल. ” पण ते मला कधीच शक्य नव्हते. दुसरे म्हणजे तुमची जिम्मेदारी घेणारी कोणी व्यक्ती इंडियात असेल तर त्यांच्या जबाबदारीवर कंपनी तुम्हाला पोचवून देईल. “ अशी कोणींच मंडळी माझ्या ओळखीची नव्हती तरीपण मी म्हटले, ” इंडियात कोण कोण इंग्लिश माणसे असतील मला काय सांगता येणार ? तुम्हीच दोन चार नावे सांगितलीत तर त्यांच्या ओळखीचा मला काहीतरी शोधही घेता येईल. “ त्यांनी फोर्ट विल्यम इथल्या मंडळींची चार पाच नावे सांगितली; पण ती सारीच मला अपरिचित होती. फोर्ट सेंट जॉर्ज मधली माणसेही मला परकीच होती. सुरतेची नावे सांगताना तो म्हणत होता ” सॅम्युअल ऑस्टिन आहे, चार्ल्स जिराई आहे, चार्ल्स वेस्ले आहे… ”

चार्ल्स वेस्ले नाव ऐकताच मी थबकलो. हे नाव मी ऐकलेले वाटले. माझी आई वेस्ले घराण्यातलीच होती. चार्ल्स वेस्ले….चार्ल्स वेस्ले…

केव्हा आणि कोठे यांचा संबंध आला होता ? मी आठवून आठवून विचार करू लागलो. आईच्या बोलण्यात दोन तीनदा हे नाव आले होते. चार्ल्स वेस्ले हे आईच्या चुलत भावाचे नाव. व इतर वेस्ले कुटुंबियांचा कितीतरी रोष असला तरी मेरी वेस्लेविषयी सहानुभूती वाळगणारा, तिच्या बाणेदारपणाचे कौतुक करणारा आणि मदतीसाठी हात पुढे करणारा चार्ल्स हा एकच मनुष्य होता. आईने त्याची मदत नाकारली असली तरी त्याच्याबद्दल तिला केव्हाही अविश्वास नव्हता. तेच तर हे वेस्ले नसतील ? आईने " काही जडचण असल्यास त्यांना भेट. त्यांचा सल्ला जरूर विचार " असेही कधीतरी सांगितल्याचे मला स्मरले. हे सारे आठवून मी त्यांनाच एक पत्र लिहून " काय करावे ? " म्हणून त्यांचे मार्गदर्शन मागितले.

तब्बल दीड वर्षानंतर त्यांचे उत्तर आले. त्यानी अगदी स्वच्छपणे सारे लिहिले होते. उगीचच आशेला लावणारी खोटी आश्वासनेही त्यांनी दिली नव्हती. उलट अगदीच झिडकारूनही टाकले नव्हते. ते म्हणत होते " माझा व्याप सांभाळावयाला मला कोणीतरी मदतनीस हवाच आहे. तो घरचाच असला तर अधिक चांगलं. त्यातून त्याच्यामुळे माझ्या प्रिय बहिणीच्या आत्म्याला थोडेतरी समाधान लाभू दिल्याचे सौख्य मिळण्यासारखी दुसरी आनंदाची गोष्ट कोणतीच नाही. तथापि कधीही कोणीही एकमेकांना पाहिले नसल्यामुळे कर्तृत्वाविषयी वा स्वभावाविषयी कोणीही कसलेच अंदाज बांधू नयेत हे बरे ! त्यासाठी वर्ष दोन वर्ष अनुभव घ्यावा नि मग घ योग्य तो निर्णय घेण्यात यावा. तोपर्यंतची जिम्मेदारी मी स्वतःवर खुशीने घेण्यास तयार आहे. "....या त्यांच्या

उमद्या विचारसरणीमुळेच मी महिनेन् महिने चालणाऱ्या या चेंगट प्रवासाला तयार झालो होतो.

इंग्लंडचा किनारा सोडल्याला दहा महिन्यांवर काळ लोटला होता. विषुववृत्त दोनदा ओलांडून भाजून काढणाऱ्या उकाड्याला सरावत आता मी मुक्कामाला येऊन लागत होतो. झांजिबार बंदराला आमचे जहाज लागले. त्या दिवशीच 'रुपार्टा' हे आमचे दुसरे एक गलबत सुरतेला जाण्यासाठी निघाले होते. त्यामुळे आम्हांपैकी पुष्कळांनी 'सॅन्टा मरिया' वरून आम्ही येत असल्याचा निरोप पूर्वीच पुढे धाडला होता. 'धक्क्यावर कोणी आलं असेल का ? नसेल तर काय करायचे ? कसे करायचे ? असे विचार माझ्या मनात आले. मी आजूबाजूला पाहिले तर शिडांच्या, बिनशिडांच्या लहान मोठ्या अनेक गलबतांच्या मधून आमचे जहाज वाट काढीत होते. लांबलचक दोराने बांधून घेऊन दोन छोट्या होड्या मार्गदर्शकाचे काम करीत पुढे चालल्या होत्या. आमच्या स्वागताकरिता कंपनीचा बँड धक्क्यावर वाजत होता. त्याचे सगळे स्वर स्वच्छ ऐकू येत होते. अखेर आमच्या जहाजाने नांगर टाकला. सात आठ लहान लहान होड्या झपाट्याने आमच्या जहाजाला येऊन भिडल्या. आम्ही सर्वचजण दोरांच्या शिड्यावरून उतरून शिस्तीने त्यात जाऊन बसलो व पाहता पाहता धक्क्याला लागलो.

सर्वांची एकच गर्दी आणि धांदल उडून गेली होती. मी बावचळून तसाच उभा राहिलो होतो. काही वेळाने "जॉर्ज रॉबिन्सन" जॉर्ज रॉबिन्सन कोण आहे ? आहे का कोणी ? " असा माझ्या नावाचा पुकारा कोणीतरी करत असल्याचे मला ऐकू आले. मी पाहिले तो पन्नास पंचावन

वर्षांचा, उमद्या चेहऱ्याचा, आणि विग घातलेला एक वृद्ध गृहस्थ चौकस नजरेने सर्वत्र शोधत होता. मी झटकन त्यांच्याजवळ गेलो, " मी. मीच जॉर्ज राबिन्सन. आपण श्रीयुत चार्लस वेस्ले तर नव्हे ? " मी हात पुढे करीत आदराने लवून त्यांना विचारले. त्यांनी हस्तांदोलन करून मला कडकडून मिठी मारली व नंतर आपल्यासमोर उभे करून माझ्या खांद्यावर हात दाबून ते मजकडे रोखून पाहू लागले. दोन मिनिटेपर्यंत ते असे एकटक रोखून पाहत होते. काहीतरी पूर्वस्मृती त्यांच्या मनात तरळून येत होत्या. अखेरीस पुन्हा एकदा मला जवळ ओढून घेत ते म्हणाले " होय ! होय ! ही हनुवटी आणि हे डोळे. ही खास मेरीचीच देणगी आहे. निळे डोळे हे आमच्या वेस्ले घराण्याचं वैशिष्टय. तुझ्या आईने ते तुझ्या वाट्याला दिले आहे. मुला, तू माझ्या बहिणीचाच मुलगा आहेस. मला संशय नाही. " ते म्हणाले. " आणि ही माझी जेनी. माझी लाडकी गोडकी मुलगी. जेनी ! माझी उद्याची आशा ! भेट तिला "

मी पाहिले. सोळा सतरा वर्षांची बाहुली सारखी दिसणारी एक गोड किशोरी मामांना लगटून त्यांच्या शेजारीच उभी होती. जेनी मला फार आवडली !

## प्रकरण दुसरे

### सर्वनाश

सुरतेच्या रूपाने एक अद्भुत आणि संपूर्ण अनोखे जग माझ्यासमोर उभे राहिले होते. इथली हवा निराळी, प्रदेश निराळा, माणसे निराळी, भाषा निराळी, सारेच अनोळखी. सुरवातीला मी पुरताच भांबावून गेलो होतो, पण मला आधार हवा होता माझ्या मामांचा आणि त्यांच्या जेनीचा. त्यांच्यामुळेच मी जगात असल्याप्रमाणे वाटे, त्यांच्यामुळेच मी एकाकी नाही याची जाणीव जागती असे. आमच्या वखारीच्या आत तर अगदी स्वदेशात असल्याप्रमाणेच मी मोकळेपणाने वागू शकत असे. या सगळ्यांच्या आधारानेच मी नव्या वातावरणाला हळूहळू रुळू लागलो.

सुरत हे एक अवाढव्य, ऐसपैस, अव्यवस्थित व तितकेच गलिच्छ शहर आहे असे माझे प्रथमदर्शनीच मत झाले. आशियामधील मी पाहि-लेले हे पहिलेच शहर.

या शहरात इतक्या विविध प्रकारचे लोक दृष्टीस पडतात की, देशोदेशीच्या वेगवेगळ्या नमुन्यांचे एक संग्रहालयच निर्माण झाले की काय असा भास होतो. राज्य मुसलमानांचे आहे, तरी मूळचे या प्रांताचे रहिवासी हिंदूच आहेत. डोक्याला भली मोठी पागोटी, कानात मोठमोठी कडी, घेरदार चुण्यांचे तोकडे अंगरखे आणि आम्हा इंग्लिशांप्रमाणेच अगदी तंग, पण अतिशय गबाळ्या असणाऱ्या विजारी असा या कनिष्ठ

दर्जाच्या बहुसंख्य हिंदूंचा पोषाख असतो, वरिष्ठ आणि सुखवस्तू लोक मात्र तलम रेशमी घोळदार कोट, रंगीबेरंगी दोऱ्यांनी बांधून तयार केलेली छोटी-मोठी पागोटी घालतात. दोन्ही बाजूंच्या खांद्यावरून पुढे खालपर्यंत लोंबकळणारी, सुमारे तीन यार्ड कापडाची, चापूनचोपून घडया घातलेली एक गळपट्टी पांघरतात. आणि पायाभोवती विजारी न घालता सुटे कापडच मोठ्या विचित्र तऱ्हेने गुंडाळून घेतात. त्याला ते धोती असे म्हणतात. शहरात मुसलमानही कितीतरी वेगळया प्रकारांचे दिसतात. इराणी आहेत, अरब आहेत, तार्तर आहेत, पठाण आहेत, नाजूक वाटणारे बोहरी आहेत. हबशी निग्रोही मी फार मोठया प्रमाणात येथे पाहिले, तेही मुसलमान धर्माचेच आहेत. बसक्या नाकाचे, चपटया डोळयांचे, वेणीचा लांबलचक शेपटा सोडणारे काही चायनीज् लोकही माझ्या पाहण्यात आले.

ईस्ट इंडिया कंपनीचे पश्चिम किनाऱ्यावरील सर्वात महत्त्वाचे ठाणे म्हणजे सुरत. येथील कंपनीच्या कार्यालयाबाहेरही स्वतःच्या जबाबदारीवर कंपनीसाठी माल गोळा करणारे कंपनीचे अडते आहेत. ते योग्य त्या कमिशनवर हे काम करतात. थोडयाबहुत खासगी व्यापाराचीही त्यांना मुभा आहे. माझे मामा हे अशांपैकीच एक कमिशन एजंट होते.

मामांच्या उद्योगात मी त्यांना मदत करू लागलो त्याला दोन वर्षावर काळ लोटला. तोपर्यंत मी त्यांच्या धंद्यात चांगलाच रुळलो. खंबायत, भडोच, अहमदाबाद येथून मालाची खरेदी करणे, मालाची प्रतवारी लावणे, दलाली ठरविणे, किंमतीत घासाघीस करून शक्य तेवढया

फायद्याचा व्यवहार करणे इत्यादी कामे मला बरीचशी स्वतंत्रपणाने करता येऊ लागली. या सर्व वेळात मी पैशाबद्दल—वेतनाबद्दल एक अवाक्षरही काढले नव्हते. माझे राहणे त्यांच्याचकडे होते. त्यामुळे अन्न, वस्त्र आणि निवारा या तीन प्राथमिक गरजा त्यांच्याइथेच भागत असत. त्यातून काही किरकोळ पैसे लागले तर मी सरळ त्यांच्याकडे मागणी करी व तेही अनमान न करता पैसे देत असत. एक वर्ष पार पडल्यानंतर मामा स्वतंत्रपणे जी कामे मला सांगत-परगावी जाऊन खरेदीचा एखादा व्यवहार करायचा माझ्यावर सोपवत त्यावेळी माझ्या कामगिरीवर कमिशन देण्यास त्यांनी सुरुवात केली. ती माझी रक्कम पेढीवरच्या माझ्या खात्यात जमा होत असे. काही गरज पडल्यास त्यातून माझ्या इच्छेप्रमाणे खुशाल उचल करायची मला परवानगी होती. ही फार चांगली व्यवस्था झाली, कारण त्यांच्याकडे मागावे न लागताच मला कमीजास्त पैसे हक्काने मिळण्याची सोय त्यात झाली. रविवारी सुटीच्या दिवशी किंवा एखाद्या जत्रेच्या प्रसंगी मी मुद्दाम जेनीलाही बरोबर घेऊन जाई. अशा गर्दीच्या ठिकाणी जेनी उघड्यावर मोकळेपणाने हिंडू फिरू शकत नसे. तिच्यासाठी बहुधा मेण्याचीच सोय करावी लागे. परंतु माझे सान्निध्य असल्यामुळे तिला बाहेरच्या जीवनात थोडेफार तरी डोकावता येऊ लागले. मॉन्सून संपला की सुरतेच्या मोकळ्या मैदानातून पतंग उडविले जात. तो सुरतेतील फारच लोकप्रिय खेळ होता. इंग्लंडमधील माझे बालपण याच पतंगाच्या नादाने व्यापले होते. तऱ्हेतऱ्हेचे पतंग, त्यांचे चित्रविचित्र आकार, त्यांच्या काटाकाटीच्या स्पर्धा व पैजा यांत सारे सुरत शहर जणू काय बेहोष होऊनच वावरत असे. कित्येकदा या

स्पर्धा मुद्दाम नेऊन मी जेनीला दाखवल्या. त्या पतंगाच्या शोकामुळेच गोपाळ सूरजलाल या माझ्या वयाच्याच एका सुरती सवंगड्याशी माझी मैत्री जमून आली.

गेल्या वर्षी केव्हातरी सुरतेच्या नजीकच्या एका छोट्या खेडेगावी हिंदूच्या देवीची एक जत्रा पाहायला म्हणून मौजेने मी गेलो असताना एका लहानशा तळ्याकाठी एकाएकी प्रचंड कोलाहल नी आरडाओरडा ऐकू आला. बघितले तो एक तरुण पतंग उडवताना पाय घसरून अनपेक्षित रीतीने तळ्यात पडला होता. आणि पोहता येत नसल्यामुळे घाबरून वेड्यावाकड्या हालचाली करत पाण्याशी झगडत होता. ते पाहताच अंगावरचा कोट झटकन काढून कसलाही विचार न करता इतर कपड्यानिशी पाण्यात उडी मारली आणि मागून जाऊन त्याची मान धरून त्याला ढकलत काठाकडे आणण्याचा प्रयत्न करू लागलो. तोवर इतर माणसेही मदतीला धावली आणि फारसा गोंधळ न होता आम्ही सुखरूप वर आलो. गर्दीतल्या अनेकांनी माझे अभिनंदन करून शाबासकी दिली परंतु या प्रसंगाने गोपाळची माझ्यावर भक्ती जडली ती काही विलक्षणच. पुढे दोन दिवसांनी गोपाळला घेऊन त्याचा बाप मुद्दाम माझा शोध करीत करीत घरी आला. आणि आपल्या मुलाला पुनर्जन्म दिल्याबद्दल त्याने पुन्हा पुन्हा माझे आभार मानले. इतकेच नव्हे तर पालथे आडवे पडून माझे पाय धरून त्याने आपले मस्तक माझ्या पावलावर ठेकवले. हिंदूमध्ये सर्वोच्च बहुमान देण्याची ही पद्धत असल्याचे तेव्हा मला समजले. वास्तविक माझी कामगिरी तशी किती क्षुल्लक. ती एक सामाजिक उपयोगी अशी बाब होती हे कबूल. परंतु त्याचे एवढे श्रेय देण्याचे काही एक कारण नव्हते. एकंदरीत मी पाहिले आहे हिंदू लोक फार कृतज्ञ असतात आणि ही

कृतज्ञता ते वारंवार ज्या रीतीने व्यक्त करतात त्यात कृत्रिमतेचा अंश-सुद्धा नसतो. गोपाळाचा पतंग उडविल्याचा शौक व त्याच उद्योगातील माझे कसब आणि अनुभव या मुळे पाहता पाहता अगदी जीवश्चकंठश्च मित्र बनून गेलो.

'स्वाली होल' या बंदर धक्क्यावरील आमच्या वसाहतीतही मी फार चटकन सामावून गेलो. मजबूत अशा दगडी भव्य नी प्रशस्त तट-बंदीच्या आत आमची वखार किंवा छोटीशी वसाहत आहे. माल साठ-विण्यासाठी एक मजलीच परंतु शंभर शंभर फूट लांबीची कोठारे आहेत. तशाच लांबीच्या बैठ्या इमारतीत लोकांच्या राहण्याच्या जागा आहेत. ईस्ट इंडिया कंपनीचे नोकर या जागातून राहतात. वखारीचा प्रमुख अधिकारी जॉर्ज आक्झेंडेन याचा बंगला एका बाजूला तर त्याच्या समोरच एक छोटेसे प्रार्थना गृह विरूद्ध दिशेला आणि मधल्या मोकळ्या मैदानात छोटीशी टुमदार बाग असे या वखारीचे अंतगर्त स्वरूप आहे. कंपनीचे अधिकारी, नोकर सैनिक, बाहेरचे अडते, या सर्वांची कुटुंबीय मंडळी मिळून सुमारे एकूण अडीचशे इंग्लिश लोक सुरत शहरात आहेत. त्यातले बहुतेक सर्व या वसाहतीच्या आतच राहतात. आमच्यासारखी बाहेर शह-रात राहाणारी दोन तीनच कुटुंबे आहेत. आम्ही सर्वजण रविवारी ठरवून वसाहतीत एकत्र जमतो. दिवसभर एकमेकांच्या सहवासात सर्वजण एकत्र घालवतो, खेळ खेळतो, करमणूक करतो आणि मजेत दिवस घालवतो.

अशाच एका रविवारी वसाहत प्रमुख जॉर्ज ऑक्संडन याने एकत्र जमलो असताना सर्वांना इशारा देऊन सांगितले की "सुरत शहरावर मराठ्यांकडून हल्ला होईल अशी कुणकूण आहे तेव्हा खबरदारी म्हणून

ग्रं. क्र. ... विषय ... क्र. ४५८



योजना आखणे भाग आहे. शहरातल्या एजंटांनी त्यांचा माल शक्य तो लवकर वखारीत हलवावा. इतरही मौल्यवान सामान असेल तर ते वखारीत आणून बंदोबस्ताने ठेवावे. सूचना मिळताच चटकन आणि शिस्तबद्ध काम व्हावे म्हणून वेगवेगळया समित्या नेमल्या जातील. सर्वांनी एकोप्याने आणि सहकार्याने या संकटाशी मुकाबला करावयाचा आहे " ही गंभीर बातमी ऐकताच आम्ही सर्वच क्षणभर गडबडलो तेव्हा दिलासा देण्याकरिता गव्हर्नर पुढे म्हणाला " हल्ला येईलच किंवा तो अगदी नजीकच्या काळात येईल असे काहीच नाही. कदाचित तो येणारही नाही. परंतु गाठ शिवाजीशी आहे आणि शिवाजी ही काय चीज आहे हे तुम्हाला माहिती नसेल. अत्यंत हुषार, धूर्त, कावेबाज आणि लुटारू म्हणून प्रसिद्ध असणारा असा हा माणूस अवचित केव्हा येऊन थडकेल हे सांगता येणे अशक्यच म्हणून आपण खबरदारी घ्यायची इतकेच. सुरतेसारख्या बलाढ्य आणि सामर्थ्यवान शहरावर हल्ला करण्याची शिवाजीची हिंमत होणार नाही असेच मलाही वाटते. " शिवाजी हे नाव मी त्या दिवशी प्रथम ऐकले. सुरतेच्या उत्तरेला अवाढव्य मुघल साम्राज्य आहे तसेच सुरतेच्या दक्षिणेला आदिलशाही म्हणून दुसरे एक मुसलमानी मोठे राज्य आहे. शिवाजी हा ह्या आदिलशाही राज्यातला एक बंडखोर छोटा जहागीरदार, पण त्याने लुटालूट करून जवळ सैन्य बाळगून बंड करीत आपला जहागिरीचा मुलूख वाढवण्यास सुरुवात केली. त्याच्या पारिपत्याकरिता पाठविण्यात आलेल्या मोठमोठया सेनापतींचा व सरदारांचा त्याने निःपात केला आणि समुद्रकिनाऱ्यापर्यंत ही आपले हातपाय पसरले. मुघल आणि आदिलशाह दोघांनाही शिवाजी म्हणजे एक कटकटीचे

दुखणेच झाले असून, एकदा एकच प्रचंड मोहीम काढून त्याला साफ नेस्तनाबूद केल्या शिवाय हे दुखणे संपणार नाही असाच त्यांचा निर्णय झाला होता असे मला कळले. उलट, इथली सारी प्रजा हिंदूच असल्यामुळे ती शिवाजीला देवाप्रमाणे मानते. त्यातून शिवाजीचा सगळा मुलूख उंच उंच डोंगर आणि खोल दऱ्याखोऱ्या यांनीच भरलेला असल्यामुळे असल्या केवढयाही प्रचंड मोहिमा आल्या तरी आपले काहीही वाकडे होणार नाही असे छातीठोकपणे शिवाजी उघड उघड सांगत असतो हेही ऐकले.

दुसऱ्याच दिवशी गव्हर्नर जॉर्ज ऑक्सेंडन यांनी आपल्याला मिळालेली शिवाजीच्या हल्ल्याची बातमी सुरतेचा मुख्य अंमलदार इनायतखान याच्या कानावर घालण्यासाठी आपला पुतण्या हेन्री याला मुद्दाम पाठवले. जॉर्जचा निरोप ऐकून इनायतखान खदखदा हसत म्हणाला, ' अरे काय मस्करी चालवली आहे तुम्ही ? शिवाजीची काय माय व्यायली आहे सुरतेकडे वळायला ! शिवाजीला सुरतेची काही माहिती नाही. तुम्हाला काही माहिती दिसत नाही. तुम्हाला भय वाटत असेल तर आमच्या किल्ल्यात या राहायला तुम्ही सगळेच डरपोक कुठले ! असे छपन्न शिवाजी आले तरी कापरासारखे जळून जातील भुरकन् ! हां, अल्लाने जर त्याची मौत इथेच नियत केली असेल तर काही इलाज नाही. त्याला इथं यावंच लागेल ! येऊ द्या, येऊ द्या, त्याला खुशाल. " बिचारा हेन्री खाली मान घालून मुकाटयाने परतला. नाताळचा सण तोंडावर आला होता. शिवाजी उत्तरेच्या रोखाने प्रचंड सैन्य घेऊन निघाल्याची वार्ताही गुप्त रीतीने आमच्यापर्यंत पोहोचली. संकटाच्या छायेतच आम्ही नाताळ

साजरा करत होतो. पण पुढे बातमी आली, की नाशिकचा मुक्काम उठ-वून डोंगर चढून शिवाजी ईशान्येकडे वळला म्हणून त्याचा रोख खानदेश आणि बागलाण या सुभ्याकडे जाण्याचा दिसला. सुरतेवरचे संकट टळल्याचा मोठ्या समाधानाने निःश्वास सोडून आम्ही दुप्पट उत्साहाने आणि आनंदाने नाताळ व नव्या वर्षाचा पाडवा साजरा केला. संकट पूर्णपणे टळले तेव्हा दोन चार दिवसांत वखारीत आणून ठेवलेला आमचा माल परत आमच्या राहत्या जागेत नेण्याचा मामांनी विचार केला.

पण हे समाधान अवघ्या दोन दिवसाचेच ठरले. तिसऱ्या दिवशी दुपारीच एकदम कोलाहल, पळापळ, घोडयांच्या टापांचे आवाज आणि त्यातच दारे खिडक्या फटाफट लावून घेतल्याचे आवाज ऐकू आले. एकाएकी प्रचंड गोंधळ वाढलासा दिसला म्हणून मी दुकाना बाहेर पायरीवर येऊन पाहू लागलो तो सुमारे शंभर स्वारांचे पथक दौडत दौडत वेगान येत असलेले दिसले. प्रत्येकाच्या पाठीला एकेक ढाल आणि उंच भाला लटकवलेला, हातात नंगी तलवार, उग्र चेहऱ्यांचे, कल्लेदार मिशांचे असे ते स्वार डाव्या हाताने घोडयांचे लगाम खेचीत खेचीत एका लयीत भर-धाव दौडत होते. डोक्यावर पीळदार पगडया, अंगात अंगरखे आणि पांढऱ्या तंग विजारी असा त्यांचा पोषाख होता. पलीकडच्याच चौकात त्यांचा म्होरक्या थांबला त्या बरोबर इतरही स्वारांनीं आपापल्या घोडयांचे वेग आवरीत त्याच्याभोवती कडे केले त्यांच्यापैकी एकाने कमरेचे शिंग काढून “ थु ऽ थुई थुई थू ! ” असा आवाज दिला. जिकडे तिकडे थोडी बहुत शांतता झाल्यावर त्यांच्या नायकाने एक कागद उलगडून मोठ्याने फर्मान वाचावयास सुरुवात केली. त्यात काय होते

ते मला स्पष्ट समजले नाही पण त्याचा आशय असा होता की, " पुणे मुलुखाची बादशहाने नासधूस केली त्याचा बदला म्हणून सुरतेतून खंडणी वसूल करण्यासाठी शिवाजी आला आहे. नागरिकांना बिलकूल त्रास होणार नाही. अधिकारी आणि व्यापारी यांनी मागितलेली रक्कम मुकाट्याने दिली तर शांतपणे आम्ही निघून जाऊ पण न दिली किंवा प्रतिकार केला तर मात्र शहर लुटले जाईल. मग जी दंगल, जाळपोळ आणि प्राणहानी होईल तिची जबाबदारी आमचेवर राहणार नाही. आजपासून सुरत शहराच्या सर्व वेशी बंद झाल्या असून शिवाजी महाराजांच्या परवानगीवाचून कोणालाही बाहेर जाता येणार नाही "........एवढे फर्मान वाचून झाल्यावर पुन्हा घोळका मोडून शिस्तशीर रांगा करून ते सर्वजण दौड करीत दुसऱ्या चौकाकडे निघून गेले.

मग शहरातला हलकल्लोळ काय विचारावा ? जिवाची आशा न धरता, कपडे, पादत्राणे, जवळचे सामान यांची तमा न बाळगता लोक धावत पळत आपापली घरे गाठू लागले. मेणेवाल्यांनी आपापले मेणे तसेच टाकले, जनावरे मोकाट सुटली. प्रचंड वेगाने माणसांच्या झुंडीच्या झुंडी सैरावैरा इतस्ततः धावू लागल्या. नदीच्या पुराचा लोंढा खळबळाट करीत लाटांवर लाटा उठवीत वेगाने पुढे पुढे उफाळत जातो तसा गर्दीचा महापूर उसळला होता. नंग्या समशेरी घेतलेल्या मराठे घोडेस्वारांची पथकेच्या पथके अधून मधून इकडून तिकडे भरधाव धावत जात त्यावेळी रस्ता दुभंग होऊन त्यांना मार्ग मिळे. पण त्यातही चेंगराचेंगरी, स्त्रिया आणि वृद्धांच्या किंकाळ्यांचे भेदक आवाज उठत. " आ गये ! सैतान आ गये ! ! भागो ! दौडो " असा आरडाओरडा ऐकू येत होता.

आमचीही तारांबळ उडाली. त्या घाईगर्दीत ज्याला जे हाताला लागले ते, आणि ज्याला जे आवश्यक वाटून आठवले तेवढे तेवढे कसेबसे गोळा करून घेऊन आम्ही घराबाहेर पडलो. मामांनी भरभक्कम एक नव्हे दोन ताळे दाराला ठोकली आणि आम्ही शक्य तेवढ्या त्वरेने वखार गाठली. सुदैवाने बरेचसे सामान आधीच वखारीत नेऊन ठेवले असल्या-मुळे आम्ही विशेष फिकीर न करता वखारीची वाट धरली होती. वखारीच्या भक्कम दरवाज्याचे दिंडी दार उघडून आम्ही आत पाऊल टाकले आणि मगच समाधानाचा निःश्वास सोडला.

आमच्या प्रेसिडेंटने धक्क्याला नांगरून ठेवलेल्या " लॉयल मर्चंट " या आमच्या लढाऊ गलबतावरून पन्नास सैनिकांची एक तुकडी आणि पितळेच्या चार हलक्या तोफा वखारीत आणून भरल्या. कंपनीचे महत्त्वाचे दस्तऐवज व इतर मौल्यवान कागदपत्रे तशाही घाईगर्दीत आमच्या दुसऱ्या एका छोट्या पण वेगवान जहाजात भरून त्याने हेन्री ऑक्संडनला सुरक्षणासाठी ' बॉम्बे ' नावाच्या जवळच्याच बेटाकडे पाठवले. आम्ही वखारीत पोचलो तेव्हा हेन्री तिकडे जाण्यासाठी निघण्याच्याच घाईत होता. त्याला निरोप दिला आणि झपाट्याने वखारीच्या संरक्षणाच्या तजविजीस आम्ही लागलो. मुख्य प्रवेशदार आतून पक्के बंद करून घेऊन शिवाय त्याच्या आत आम्ही भरलेल्या मालाची पोतीच्या पोती रचून भक्कम भिंत तयार केली. माऱ्याच्या जागा हेरून सहा तोफा तटबंदीवर योग्य त्या त्या ठिकाणी चढवून टाकल्या.

आमचे धैर्यबळ वाढावे म्हणून प्रेसिडेंटने आम्ही सर्व इंग्रज जवान व पन्नास काळे शिपाई मिळून दोनशे माणसांचा एक सुरेख रूट मार्च

पडघम आणि बिगुल यांच्या तालावर पावले टाकीत शिस्तबद्ध जाणारा असा आयोजित केला व तो मैलभर शहर रस्त्यावरून मिरवत आणला. आमच्या निर्भयपणाची सुरतेच्या नागरिकांनीच नव्हे तर मराठे सैनिकांनीही प्रशंसा केली. कारण त्याच्याच आधी सुरतेचा अंमलदार इनायतखान हा स्वतःच सुरतेच्या किल्ल्यात जाऊन लपून बसला होता, असे आम्हाला नंतर समजले.

पुढचे तीन दिवस आम्ही आमच्या वखारीत कडेकोट बंदोबस्तात काढले. बाहेरच्या जगाशी आमचा संपर्क तुटलाच होता. पण त्या तीन दिवसांत सुरत शहरभर वडवानल आणि महाप्रलय यांचे तुफान थैमान चालले होते. शिवाजीचे पाच हजार सैनिक शहरभर फिरत होते. मोठमोठ्या व्यापाऱ्यांची यादी त्यांच्याजवळ आधीच तयार होती. त्या सर्वांना त्यांनी गिरफदार करून छावणीत नेले. ठरलेली दंडाची रक्कम वसूल झाली तरच त्याची सुटका, नाहीतर त्यांचा वध असेच सत्र सुरू होते. ज्यांनी नकार दिला होता, त्यांचे वाडे खणून कोठारे आणि भुयारे फोडून जमीनदोस्त करून शिवाजीच्या सैनिकांनी संपत्ती बाहेर काढली. इनायतखान स्वतः पळून जाऊन किल्ल्यात लपून तर बसलाच, परंतु त्यातही त्याने किल्ल्यातून तोफांचा शहरावर मारा करण्याचा मूर्खपणा केला. लागोपाठ दोन रात्रभरच्या वेळात या मूर्खाने शहरात वाटेल तसे तोफांचे गोळे सारले. त्यामुळे शिवाजीचे नुकसान तर काहीच झाले नाही उलट ज्या ज्या घरांवर हे गोळे पडले ती ती घरे धडाधडा पेटू लागली आणि साऱ्या सुरतभर अग्निज्वालांचे लोटच्या लोट दिसू लागले. रात्रभर आकाश लालेलाल होऊन गेले. जानेवारीच्या थंडीच्या रात्री

असूनसुद्धा आगीच्या धगीने गरमागरम वातावरण झालेले अशी स्थिती अनुभवाला आली. आमच्या वखारीच्या शेजारीच प्रसिद्ध बोहरी व्यापारी हाजी बेग याची हवेली होती. एका रात्री ती धडाडा पेटून निघाली. आमच्या वखारीपर्यंत त्या ज्वाळा येऊन भिडल्या. छपरावरच्या कौलांवर तिथल्या प्रथेप्रमाणे वाळलेले गवत पसरले होते, त्याने चटकन पेट घेतला. इतकेच नव्हे तर आतील झाडाची एक फांदी बाहेर गेली होती तीही धडधडा जळू लागली. आम्ही त्यावेळी रात्रीचे जेवण घेत होतो. हातातला घास तसाच टाकून सर्वजण उठलो. आजूबाजूचे गवत दूर करून पेटल्या गवताचा संपर्क रोखला आणि झाडाची फांदी तोडून ती बाहेर फेकून दिली. एक तासभर खटपट केल्यानंतर हे साध्य झाले, पण तोवर सारेजण घामाने डबडबून निघालो होतो. आमच्या वखारीला लाग-लेली ती झळ एवढीच.

अखेर तीन दिवसानंतर हा प्रचंड कोलाहल थांबला. तीन दिवसांत पाच कोटी रुपयांची लूट करून ती उंटांवर, बैलांवर लादून, आल्या इतक्या त्वरेने शिवाजी निघूनही गेला. लोक घराबाहेर आले आणि मग रडारड, आक्रोश यांना सुरुवात झाली. उभे शहर जळत राहिले होते. शिवाजीपेक्षा सुभेदाराला शिव्या घालत लोक टाहो फोडत होते. मामा मी आणि जेनी तावडतोब आमच्या हवेलीपाशी आलो. पाहतो तो काय ? आमचे घर फुटले होते, लुटले होते. तोफांचे गोळे पडून छप्पर कोसळून अर्धवट जळून गेले होते. दुसऱ्या मजल्याच्या भकास आणि पडक्या भिंतीच तेवढया उभ्या दिसल्या. तो सर्वनाश पाहताच आमचा मेंदू अगदी बधिर होऊन गेला. तरीही धक्का पचवून काय गेले, काय राहिले याची पाहणी करीत आम्ही खोल्या खोल्यांतून फिरत होतो.

तेवढयात मामांना कसलीतरी आठवण आली. ते एकदम मधल्या खोलीत धावले. तिथल्या भक्कम लाकडी कपाटाचे दार सताड मोडून पडले होते. आतले सारे खण उघडे रिकामे होते. काही सामान खाली पसरले होते. "करंडक ! करंडक कोठे आहे ?" जेनी ! आपला करंडक कोठे गेला ? ते जोरात ओरडले. "हाय रे दुर्दैवा ! माझा करंडा गेला.



माझं सर्वस्व लुटलं गेलं ! आता जगून तरी काय उपयोग ?" मामा किंचाळले आणि मटकन खालीच बसले. त्यांच्यावर वज्राघात झाला होता. जेनीही सुन्न झाली आणि मी बावचळून, गोंधळून पहात राहिलो. कसला करंडक ? काय होतं त्यात ? कोठे होता ? केव्हा होता ? केव्हा गेला ? कोठे गेला ? असे असंख्य प्रश्न मजभोवती फेर धरून नाचू लागले.

प्रकरण तिसरे

## निश्चय ठरला

" माझा करंडक ! ", " करंडक गेला तसा माझा जीव का नाही गेला ? " असे म्हणून डोळे उघडून इकडे तिकडे पाहत मामांनी आपले नेत्र विस्फारले. त्यांची नजर पुन्हा एकदा त्या कपाटाच्या चोरखणात शिरली. हातांनी चाचपडत त्यांनी त्या लाकडी खणाचा कानाकोपरा धुंडाळला आणि पुन्हा ते खाली कोसळले. त्यांची शुद्ध हरपली. जेनी लगेच त्यांकडे धावली. दोन्ही हातांनी मामांचे मस्तक वर उचलून धरीत ती म्हणाली " बाबा ! बाबा ! असं काय करता ? बाऽबाऽ ! बोला ना ! " बोलता बोलता तिचा स्वर रडवेला झाला म्हणून मी चमकून तिच्याकडे पाहिले, तोच " बाऽऽबाऽ " अशी किंकाळी फोडून तिनेही आपल्या वडिलांच्या अंगावर आपले अंग टाकले.

घरात प्रवेश करणारी आम्ही इन मीन तीन माणसे. त्यांपैकी मामा आणि जेनी, दोघेही मूर्च्छित झालेली. मी तर पुरताच भांबावून गेलो. पण घुम्यासारखे गप्प राहून चालणार नव्हते. त्वरेने काहीतरी करणे तर भागच होते. त्यांना माडीवर तसेच सोडून मी खाली आलो. मुख्य म्हणजे पाणी हवे होते. पण ते होते कोठे ? होते नव्हते ते सारे काही धुऊन काढल्यासारखे उजाड झाले होते. एक भांडेसुद्धा धड नव्हते. फुटक्या तुकडयाचा, चिंध्यांचा, कागदाच्या कपटयांचा खच जिकडे तिकडे पडलेला

होता. आमच्या घरातच मागच्या अंगणात विहीर होती. तिचा दोर तेवढा तेवढा नुसताच लोळत जमिनीवर पडला. मी धडपडून कुठून तरी तांब्याचा एक लोटा शोधून काढला व त्यालाच दोराने घट्ट गाठ मारून विहिरीत सोडला. अवघे एक भांडेभर पाणी ! इतक्या दीर्घ खटपटी-नंतर ते जेव्हा विहिरीतून माझ्या हाताशी आले तेव्हा मला कोण आनंद झाला. दोर न सोडता तसाच ळळत लोंबत घेऊन, भांडे घट्ट धरून मी धावत धावत माडीवर गेलो. जेनीला उचलून मामांच्या अंगावरून बाजूला घेतले. दोघांनाही सरळ व्यवस्थित निजवले. मामांच्या कोटाचे बंद सोडले. कॉलर सैल केली. त्यांचा दीर्घ श्वास चालू होता. आणलेल्या पाण्याचे जेनीच्या चेहऱ्यावर हबके मारले. ती लवकर शुद्धीवर येईल असा माझा कयास होता तो खरा ठरला. थोडयाच वेळात ती सावध झाली. " जेनी ! लाडके ! सावध झालीस का ? मी आहे इथं. घाबरू नकोस. हे घर पाणी ! " असे म्हणत मी तिचे मस्तक उचलून धरत पाण्याचे भांडे तिच्या तोंडाला लावले. एकदोन घोटच पाणी भांडयात होते पण तेवढे तिच्या घशाखाली जाताच ती पुष्कळ हुषार झाली. ती उठून बसली व नीट डोळे उघडून, सावध होऊन इकडे तिकडे पाहू लागली. तिला जवळ घेऊन पाठीवरून हात फिरवीत मी म्हटले " जेनी सारे काही व्यवस्थित होईल. धीर सोडू नकोस. सावध हो. जरा विश्रांती घे. श्रम मी करतो. पण तुझं सहकार्य हवं आहे. तू ठीक असलीस की तुझ्या आधाराने हा हा म्हणता मामांना शुद्धीवर आणू. " माझ्या सौम्य बोलण्याने तिला पुष्कळच धीर आला. ती सावरली आणि म्हणाली, " मी ठीक आहे जॉर्ज ! आता आधी बाबांच्याकडे लक्ष पुरवू. मी काय करू ते सांग ! "

" काही नको ! तू नुसती इथं स्वस्थ बसून राहा, त्यांना आधार म्हणून. मी आणखी थोडेफार पाणी काढून आणतो. इथे कोणीतरी जागे आहे हे माहिती असल्यामुळे मला जरा शांतपणे हालचाली करता येतील. मी येतोच दोन चार मिनिटांत "

दोर आणि भांडे उचलून मी खाली आलो. आणखी शोधाशोध करून दुसरे एक मोठे लोखंडी पात्रही मी शोधून काढले पण ते उथळ व पसरट होते. विहिरीत सोडायची सोय नव्हती. तरीपण तेही बरोबर घेऊन मी परत विहिरीवर गेलो आणि मघाच्या छोटया लोटयानेच आठ दहा वेळा थोडे थोडे पाणी काढून ते परळ अर्धे पाऊण भरले व तेवढे पाणी घेऊन मी वर गेलो.मामांच्या डोळयांना पाणी लावले. त्यांच्या चेहऱ्यावर पाण्याचे हबके मारले. बराच वेळ झाल्यामुळे ते आता आपोआपच शुद्धीवर येऊ लागले होते. प्रथम त्यांनी डोळे उघडले मग मान इकडे तिकडे फिरवून सभोवार पाहिले. जेनी आतुरतेने त्यांच्या तोंडाकडे पाहत होती. ते पूर्ण सावध झाल्यावर आम्ही दोघांनी धरून त्यांना बसते केले. जेनीने हातच्या ओंजळीनेच त्यांना थोडे पाणी पाजले. ते पूर्णपणे शुद्धीवर आले. दहा पंधरा मिनिटे अशीच गेली, ते पुन्हा थकले, म्हणाले, " मी पडतो जरा." जेनीने आपल्या मांडीवर त्यांचे डोके घेतले आणि हलक्या हाताने ती त्यांना थोपटू लागली. पाहता पाहता त्याना शांतपणे झोपही लागली.

मी सभोवारच्या सर्व खोल्यांतून हिंडून जे जे काही धड असेल ते सामान एका बाजूला करावयास सुरुवात केली. काही छोटी मोठी भांडी, काही लहान मोठे कपडे, पांघरुणे असे काहीबाही हाताला लागले ते उचलून बाजूला केले. दोन चार चिरगुटे नीट आंथरून त्यातल्या त्यात

एक बरासा बिछाना करून मामांना नीट झोपवले, डोक्याखाली उशी दिली. त्यांची नीट व्यवस्था लागल्यानंतर मी व जेनी दोघेही घरात इतर आवराआवर करावयास मोकळे झालो.

एवढा वेळ होईपर्यंत बाहेर रस्त्यावर नेहमीची वदळ झपाट्यान सुरू झाली होती. संकट पूर्ण टळले अशी खात्री होताच बघ्यांच्या झुंडीच्या झुंडी शहराची एकूण हालत काय आहे ते पाहण्यासाठी बाहेर पडल्या होत्या. आमच्या नेहमीच्या परिचयातील काही माणसेही विचार-पूस करण्यासाठी घरात डोकावली पण मी त्याना खालच्या खालीच वाटेला लावले. संध्याकाळ होऊ लागताच मी झपाट्याने एकटाच वखा-रीत गेलो. प्रेसिडेंटला सांगून चार मेणबत्त्या, खाण्याचे काही पदार्थ पाण्यासाठी एक बकेट, अंथरण्यापांघरण्यासाठी दोनचार चादरी असे जिन्नस घाईगर्दीत गोळा करून घरी येण्यासाठी निघालो. प्रेसिडेंटने तेवढ्यात ‘ जिन ’ मद्याचा एक छोटा बुधला माझ्या सामानात टाकला. म्हणाला, “(तुझ्या ‘ अंकल’साठी हे एवढंच एक औषध मी आज देऊ शकतो. उद्या आणखी इतर काही पाहू. ” आणलेल्या साहित्याच्या साहाय्याने त्या रात्री अगदी नेहमी इतक्या मोकळेपणाने आम्ही निदान मी तरी शांतपणे निद्रा घेऊ शकलो.

दुसरा दिवस उजाडला. मी आणि जेनी झटून घर आवरणीच्या कामाला लागलो. मामा आता पुरते सावरले होते. पण खरं बोलायचं तर ते पुरे पुरे खचले होते. एका रात्रीत, दहा वर्षांनी म्हातारे झाल्या-सारखे ते दिसू लागले. त्यांचा सारा जोम संपलाच होता पण पोरे झपाटा धरून कामे उरकत आहेत हे पाहून त्यांनीही उभारी धरली.

नीट कपडेबिपडे करून हातात काठी घेऊन ते म्हणाले, " मी जरा वखारीत जाऊन येतो. पुढची हालचाल सुरू केली पाहिजे. " जेनी एकदम त्यांच्याजवळ गेली. तिने बळजबरीने त्यांना खाली बसवत म्हटले, " तुम्ही कुट्ठं जायचं नाही बाबा ! आजच नाही, आणखी तीन दिवस तरी मी तुम्हाला हलू देणार नाही. तुम्ही अगदी पूर्ण बरे झालात की मग मीच तुमच्याबरोबर येईन बाहेर. " मीही त्यांना म्हटले जेनीचंच बरोबर आहे ! मामा. तुम्ही अजून दोन दिवस अगदी पूर्ण विश्रांती घ्या. तेवढी मिळाली की पुन्हा हा हा म्हणता आपण पूर्व स्थितीवर येऊ ! प्लीज आज तरी आमचं एवढे ऐकाच ! "

" आता कसची पूर्वस्थिती ? ती उमेद मी सोडलीच. जे हरपलं ते कायमचंच. " ते पुन्हा गवसणार आहे थोडंच ? " एक मोठा सुस्कारा टाकून मामा म्हणाले. पुन्हा एकदा सारा रंगच पालटू पाहत होता पण विषय पालटण्यासाठी एकदम उठलो व म्हणालो, " ठीक ! आहे ! जे गेलं तेही आपण मिळवायची शिकस्त करू; पण तो विषय नंतरचा. आज तरी आपल्यापुढे इतकी कामे आहेत की ती आवरू म्हटले तरी संपायची नाहीत. चल जेनी. मामा तुम्ही आज घरातच थांबा नी इथली सगळी व्यवस्था तुमच्या देखरेखीखाली लावून घ्या. दुपारी आपण सगळीजणच वखारीत जाऊ ! काय ? " आणि जेनीचा हात धरून, " चलो ! पहिलं स्वयंपाकघर ! तासाभरात सर्व लख्ख लावून झालं पाहिजे " असे म्हणत तिला घेऊन उद्योगाला सुरुवातही केली. मामा संथपणे बसून सारे पाहतच राहिले.

मी जेनीला एका बाजूला घेऊन विचारले, " जेनी ! मामा कोणता

करंडक म्हणत आहेत ? काय होतं त्यात ! मी तो पाहिला कसा नाही ? " ती म्हणाली, " अरे ! मामांच्या जेवढ्या काही महत्त्वाच्या गोष्टी होत्या तेवढ्या एकत्र साठवून त्या करंडयात ठेवल्या होत्या. मुख्य म्हणजे माझ्या आईचं चित्र असलेला एक हार होता एका छोटया हस्तिदंती पदकावर आईचं चित्र रंगवलेलं होतं त्याच्या सभोवती माणकांचे खडे जडवलेले होते. आणि हारात लहान लहान हिरे बसवलेले होते. " " होय ! होय ! मला आठवतो आहे तो हार ! गेल्या वर्षी मामांनी एकदा बाहेर काढून मला दाखवला होता तो. मी त्यावेळी म्हणालो सुद्धा की, ' जेनी अगदी तिच्या आईचीच प्रतिमा दिसते म्हणून शिवाय आणखी चार्लस राजानं मामांना दिलेली एक गौरवाची सनदही त्यांनी दाखवली होती. "

" तेच ! तेच सगळे कागदपत्र आणि इतरही काही बाही बाबांनी एका करंडकात घालून जपून ठेवलं होतं. तो करंडकच हरवला आहे. "

मला सारा उलगडा झाला, एकाएकी हल्ला आला म्हणून घाईगर्दीने आम्ही निघतो काय ! नेमके त्या करंडकाचे विस्मरण होते काय ? आणि कपाटातल्या चोरखणात ठेवलेला करंडक नेमका लुटारूकडून पळवून नेला जातो काय ? सारेच अद्भुत घडले होते. एव्हाना। लुटीतल्या इतर सामानाबरोबर सुखरूपपणे तो करंडक नक्कीच शिवाजीच्या मुलखाची वाटचाल करीत असला पाहिजे.

" काय हरकत आहे थेट शिवाजीपर्यंत पोचून त्या करंडकाची मागणी करायला ? " माझ्या मनात लख्खकन् विजेसारखा एक विचार चमकून गेला. पण मी तो तसाच दाबून ठेवला. कारण पहिल्यांदा सर्व स्थिरस्थावर कसे होईल हेच पाहायला हवे होते.

पण त्याच दिवशी रात्री मामांच्या निराशावादाने पुन्हा उचल खाल्ली. “ आता जगण्यात काहीच अर्थ नाही. माझं सारं आयुष्य संपलंच. जेनी ! आपण आता ताबडतोब मायदेशी परतावं हे बरं ! माझा शेवट तिथं होऊ दे. ” ते म्हणाले, ‘ इथला पसारा आवरून निरवानिरवीची योजना ताबडतोब हाती घेण्याचा विचार त्यांनी बोलून दाखविला. अर्थात सगळे आवरून स्वदेशी जायला निघणे म्हणजे काही सोपी गोष्ट नव्हती. चार सहा महिन्यांचा अवधी तरी खासच लागणार होता. करंडकाच्या प्राप्तीसाठी तेवढ्यात काहीतरी धडपड करायचा माझा विचार पुनः पुनः उसळी मारून वर येऊ लागला.

दुसऱ्या दिवशी मामा वखारीत गेले आहेत असे पाहून मी जेनीला म्हणालो, “ जेनी ! त्या लुटारू शिवाजीकडे मी असाच जातो आणि वाटेल ती धडपड करून तो करंडक परत आणण्याचा प्रयत्न करतो. काय हरकत आहे असे करायला ? ” पण ती कल्पना जेनीच्या मेंदूपर्यंत पोचताच ती भीतीने मला एकदम बिलगलीच आणि घट्ट मिठी मारून म्हणाली “ नाही ! नाही ! जॉर्ज ! असं काहीही बोलू नकोस ! तू इथून जायची कल्पनाच मला सहन होत नाही. मला खात्री आहे, तो करंडक आता परत मिळणार तर नाहीच पण तू जर मला इथं सोडून गेलास तर मी जिवंतही राहणार नाही. कृपा कर आणि अशी भाषाही काढू नकोस. ” तिला रडू कोसळले. जेनीची माझ्यावर किती अत्युत्कट प्रीती होती ते मला त्याक्षणी समजलं. आजवर तारुण्याला योग्य अशा भावना माझ्याही मनात अनेक वेळा उद्भवल्या होत्या. जेनीबद्दलची अनिवार ओढ मलाही लागली होती. परंतु ती भावना मी

तोंडावाटे कधी उच्चारली तर नाहीच परंतु माझ्या वागणुकीतसुद्धा यत्किंचितही प्रगट होऊ दिली नाही. कारण किती झाले तरी मी मामांचा एक आश्रितच होतो. मी मनानेच घालून घेतलेल्या मर्यादेचे उल्लंघन होऊ दिले नव्हते. जेनीच्या हृदयाचाही आजवर थांग लागला नव्हता; परंतु तिची माझ्याबद्दलची भावना आज अशा रितीने प्रकटली. तिच्या पाठीवरून हात फिरवीत तिला धीर देत मी म्हणालो "ठीक आहे ! तो विचार मी बाजूला टाकला. तू काळजी सोडून दे बरे."

परंतु जेनीच्या प्रीतीची अशी जाणीव झाल्यामुळेच. तिच्या आणि तिच्या बाबांच्या मनाला अत्यंत प्रिय वाटेल अशी साहसी कृती करण्याचा विचार सतत माझ्या भोवती फेर धरून पिंगा घालू लागला. मी सर्व बाजूंनी त्या प्रश्नांची फोड करून पाहू लागलो. शिवाजीकडे जाता येणे अशक्य आहे काय ? करंडक दृष्टीस पडेल काय ? त्याची मागणी केली तर काय काय होऊ शकेल ! त्याबद्दल भरपाई, दंड द्यायची तयारी ठेवली तर किती द्यावा लागेल ? या साऱ्या प्रकारात जिवावर बेतेल अशा अडचणी आहेत काय ? हे प्रश्न माझे मीच उभे करून त्याची उत्तरे शोधू लागलो. त्यात जिवाला काही भीती आहे असे मला मुळीच वाटेना. आणि दंड किंवा भरपाईचा प्रश्न आलाच तर मामा ती रक्कम आनंदाने कबूल करतील. तर मग हे साहस का करू नये ? क्षणाक्षणाला त्यात धोका आहे खरे आणि त्याला मर्यादा नाही हेही कबूल, परंतु हे साहस मी नाही करायचे तर माझी जवानी हवी कशाला ? शिवाय जेनीची प्रीती हे त्या साहसाचे केवढेतरी विलोभनीय पारितोषिक आहे ! त्यापुढे कोणत्याही संकटाची मातब्बरी ती काय ? झाले, माझा निश्चय ठरला.

मी गोपाळला गाठले. " गोपाळा ! शिवाजीची राजधानी कोणती ? इथून किती दूर आहे ? "

" हा ! एका पहाडी किल्ल्यावर तो राहतो. राजगड का रायगड असे त्या किल्ल्याचे नाव आहे. इथून असेल दोनशे-अडीचशे मैल ! मला माहीत नाही, पण मी एक दोन दिवसांत तपास करतो. "

" तो तर करच ! पण आपण अडीचशे मैल धरू ! " मी घोडयाचा वेग लक्षात घेऊन मनात हिशेब केला. रोजचे वीस मैल म्हटले तर बारा तेरा दिवसांचा प्रवास. " गोपाळा ! तुला सध्या काय काम आहे ? महिना पंधरा दिवसाची सवड काढशील काय ? तुझा खर्च मी करीन. आपल्याला शिवाजीची भेट घ्यायला जायचे आहे. "

" ते फार धोक्याचे आहे. "

धोका तर खराच ! पण काही कोणी आपला जीव घेणार नाही ! अरे, धोक्याचा विचार बुढ्ढयांनी करायचा असतो. जवानांनी निखाऱ्यावर पावले टाकताच निखाऱ्यांची फुले होतात माहीत आहे ? "

" मी उद्या नक्की सांगतो जॉर्ज "

" सांग, पण ' नाही ' असे सांगू नकोस. ' होय ' म्हणूनच म्हण. आपण दोघे एकमेकांना आहोत. भीती आणि काळजीची बातच सोड.

" उद्या सकाळीच सांग. तोवर मलाही विचार करू दे. "

पंधरा आणि पंधरा तीस दिवसांचा दोघांचा प्रवास. वाटखर्ची किती लागेल ! घोडे हवेत. ते इथे विकतच घ्यावेत. हत्यारं काय काय हवीत ? इतर कोणत्या वस्तू जवळ हव्यात ? " मी अंदाज घेत होतो. प्रेसिडेंट-कडे वखारीत जाऊन दोनशे रुपये घेतले. ' मामांना तूर्त कळवू नका '

म्हणून सांगितले. त्यालाही आमच्यावरच्या संकटाची कल्पना होतीच. त्याला वाटले कसल्यातरी किरकोळ रोजच्या खरेदीसाठी तात्पुरती उचल आहे, त्याने तत्काळ मागणी पूर्ण केली.

शिवाजीने सुरत सोडली त्याला आता पाच दिवस झाले होते. ती सगळी लूट बैलांच्या तांडयावरून जाणार म्हणजे प्रवास तसा सावकाशीचाच, त्याच्यापेक्षा आमचा घोडयावरचा प्रवास नक्कीच अधिक जलद असणार. त्यांचा मागोवा घेत घेत गेले तर वाटेत कोठेतरी त्यांना नक्कीच गाठता येईल. ते काही तितकसे अवघड नव्हते.

गोपाळने तयार असल्याचे सकाळीच येऊन सांगितले. ताबडतोब दोन घोडे विकत घेण्यासाठी त्याला पिटाळले. सगळे काम गुपचूप करायला हवे होते. जेनीला आणि मामांना संकटात पाडतो आहोत असे सारखे मनात येत होते. परंतु आमचं दैनंदिन जीवन आता सुरळीत चालू झाले होते. दुसरी कोणतीही अडचण किंवा संकटे दिसत नव्हती. त्यामुळे माझ्या वियोगाचे दु:ख ती सहन करू शकतील असा मला भरवसा वाटत होता.

गोपाळाने दोन तट्टे घेतली. चाळीस चाळीस रुपये द्यावे लागले. तट्टे भिकार वाटली, पण अस्सल अरबी घोडयांच्यापेक्षा तहान सोसण्यात, लांबचा पल्ला गाठण्यात आणि मुख्य म्हणजे डोंगरांची चढ उतार करण्यात ती अधिक चिवट असतात असे त्याचे म्हणणे होते व पुढील एकंदर अनुभवांनी खरेही ठरले. गोपाळला मी एक उत्कृष्ट तलवार आणि एक कटयार दिली. मीही एक तलवार घेतली. दोन चांगली पिस्तुले भरपूर गोळयांसह माझ्या दोन्ही खिशांत टाकून दिली.

उन्हे कलली होती. मी जेनीला सांगितले, " मी गोपाळबरोबर जरा

शेजारच्या खेडयात जाऊन येतो. रात्री परत येईन किंवा उशीर वाटला तर उद्या सकाळी परतेन " गोपाळ आला. त्याच्या बरोबर बोलत बोलत बाहेर पडलो. त्याने दूर अंतरावर घोडी उभी केली होती. त्यावर मांड ठोकून आम्ही हळूहळू गावातल्या गल्ल्या पार करीत गावाच्या तटाच्या 'बऱ्हाणपूर वेशी'च्या प्रचंड दरवाज्यातून बाहेर आलो. पाठीमागे पश्चिमेकडे सुरतेच्या आकाशात मावळतीच्या सूर्याने चित्रविचित्र रंगांची उधळण केली होती तर पूर्व हळूहळू अंधार दाटून येत होता. जानेवारीच्या थंडीचे गार वारे वाहत होते. पूर्व क्षितिजावर गुरूचा तारा चमकत होता. मला क्षणभर फार गंभीर वाटले. त्या गांभीर्यातच आम्ही पुढे पुढे मार्ग आक्रमू लागलो.

**प्रकरण चार**

## पाठलाग

आता आम्ही खऱ्या अर्थाने आमच्या मोहिमेला सुरुवात केली होती. वद्य पक्षातले दिवस होते चंद्र अजून उगवला नव्हता. परंतु सारे आकाश तारकांनी उजळून निघाले होते, गार वाऱ्याच्या सुखद लहरी फार उत्साह देत होत्या. हळूहळू उधना गाव मागे टाकून आम्ही गणदेवीच्या रस्त्याने चाललो. घोडी दुडक्या चालीने चालत होती, त्यांच्या टापांचा लयबद्ध

आवाज आणि बाकी सर्वत्र नीरव शांतता अशा वातावरणात मला काही गुणगुणण्याचा मोह व्हावा यात नवल नव्हते. मी अनेक गीते मुक्तपणाने म्हटली. इतक्या मोकळ्या आवाजात मी यापूर्वी कधीही गायलो नसेन. माझे गाणे थांबले की गोपाळा त्याच्या ठेवणीतले एखादे गाणे ठेवून देत असे. संथ ठेक्यावर आम्ही मैलच्या मैल मागे टाकीत असताना केव्हातरी आकाशात चंद्राचे अर्ध बिंब उगवले आणि धुक्यात गुरफटलेली राने, दूरच्या गावातील घरे, चांदीच्या रसाने न्हाऊन निघाल्याप्रमाणे दिसू लागली. गणदेवी गावाच्या वेशीबाहेरच घोडे बांधून ठेवून एका झाडाखाली आम्ही निद्राधीन झालो

पहाट झाली. पक्ष्यांचा किलबिलाट वाढू लागला. गावातून लोकांची ये जा सुरू झाली. आम्ही झटकन उठून गावात गेलो. मला एक काम त्वरेने करणे भाग होते. काहीही झाले तरी " घर सोडून शिवाजीच्या राजधानीची मी वाटचाल सुरू केली आहे " हे मामांना कळवणे भागच होते. गणदेवी गावातच गोपाळाच्या ओळखीचा एक सोयरा होता त्याचा शोध काढला. त्याला पैसे देऊन माझे पत्र ताबडतोब जाऊन मामांना देण्यास सांगितले. पत्रात मी लिहिले होते, " ... ह्या माझ्या विचाराला तुमचा पाठिंबा मिळणे अशक्य आहे हे मला माहिती होते मग तुम्हाला विचारण्यात अर्थ तरी काय होता ? म्हणून केवळ तुमच्या न कळत हा बेत अमलात आणण्याचा प्रयत्न मला करावा लागला. जेनीजवळ माझा हा विचार मी एकदा बोलून दाखवला होता, परंतु तिचाही तितकाच प्रखर विरोध दिसल्यावर मी गप्प राहिलो. हे साहस आहे हे मी मान्य करतो परंतु अनेकवार विचार करूनही यापासून परावृत्त व्हावे असा कोणताही मुद्दा

मला आढळेना. मग उगाच केवळ भीतीपोटी काहीतरी वेडेवाकडे घडू शकेल या नुसत्या कल्पनेनेच का प्रयत्न टाळायचा !

" तुमची परवानगी न घेता, एक प्रकारे तुम्हाला फसवून मी घरातून बाहेर पडलो त्याबद्दल मी नम्रपणे क्षमायाचना करीत आहे. परंतु आपल्याच घरातल्या माणसांची फसवणूक तशीच चालू ठेवणे हे जास्त अन्यायकारक आहे हे लक्षात आणून मी अतिशय त्वरेने खरी ती हकीकत आपल्या कानावर घालत आहे एवढे तरी आपण दयाळू बुद्धीने ध्यानात घ्यावे आणि माझ्यावरचे आपले वात्सल्य कमी होऊ देऊ नये.

" हाती घेतलेल्या कामाचा अनुकूल अथवा प्रतिकूल कसाही सोक्षमोक्ष लावूनच परतण्याचा माझा निश्चय आहे. ह्या माझ्या कृत्यामध्ये कोणाचेच अहित नसल्यामुळे मला ते अंगीकारिताना संकोच वाटत नाही. उलट सर्वांच्या सदिच्छा पाठीशी असणारी सत्कृत्ये यशस्वीच होतील अशा विश्वासाने मी पाऊल उचलले आहे. आपला आशीर्वाद असावा. "

पत्र लिहून देऊन ते खात्रीने पोचविण्याची व्यवस्था केली. तेव्हा आम्ही झपाट्याने आगेकूच करून पाताळगंगा नदी ओलांडण्याची घाई केली व मगच निश्चिंत झालो. कारण ह्या नदीच्या दुसऱ्या तीरावरून शिवाजीचाच मुलूख सुरू होतो. माझे पत्र माघारी जाऊन सुरतेला पोचेपर्यंत आमच्यामधील अंतर वाढणे हेच जास्त फायद्याचे होते.

आमचा पुढचा प्रवास ठरलेल्या योजनेप्रमाणे चालू राहिला. शिवाजीचा तांडा कोणत्या मार्गाने गेला त्याची आम्ही प्रथम चौकशी करत असू. बहाणा असा केला होता की लुटीच्या वेळात सुरतेला माझी आणि शिवाजीची गाठ पडली होती. त्याने मला काही चाकरी देऊन रायगडावरच

बोलावले होते. खरे म्हणजे आपल्याबरोबरच तो मला नेणार होता; परंतु माझ्या इतर अडचणींमुळे मला ते जमले नाही म्हणून आता त्यांच्या मागोमाग जाणे भाग पडले आहे. आम्ही दोघेच सडे फटिंग; बरोबर ओझे वगैरे फारसे काही नाही, त्यामुळे लोकांना ते खरेही वाटे; म्हणूनच या रस्त्याने असे जा असे बरोबर मार्गदर्शन मिळत गेले. उगीच कोणी फसवाफसवी केली आहे असे कधी आढळून आले नाही. पण एक दोन वेळा शिवाजीनेच मात्र शत्रूला हुलकावणी देण्यासाठी आडवाट करून लांबलचक वळसे घेतलेले आढळले.

कल्याण सुम्यात आसगाव म्हणून एक छोटे खेडेगाव आहे तेथे दक्षिणेची वाट सोडून त्याने अचानक पूर्वेची वाट घेतली. पुढे एक डोंगर चढून उतरायचा व अशी पंधरा मैल वाटचाल केल्यावर जे ठिकाण आले ते आसगाव पासून अवघ्या चार मैल अंतरावरचे निघाले मधल्या ठिकाणी शत्रूची एक छावणी असल्याच्या संशयावरून त्याने हा द्राविडी प्राणायाम केला होता.

जानेवारीचा महिना होता. बहुतेक पिकांची कापणी मळणी चालू असे. कोठे कोठे भातानंतर घेतलेल्या कडधान्यांच्या पिकांनी शेते डोलत होती. मार्गात कोठेही दृष्टी टाकली तरी आजूबाजूच्या शेतातून शेतकऱ्यांची काही ना काही कामे सर्वत्र चालू आहेत असेच दिसे. एवढे सैन्य आले आणि गेले पण त्या शेतकऱ्यांना अथवा त्यांच्या पिकाला यत्किंचितही उपद्रव झाला नव्हता. शेतकरी अभिमानाने सांगत, "आमच्या राजाची सैन्याला कायमची ताकीदच आहे की जाताना वाटेतल्या शेतकऱ्यांच्या काडीला सुद्धा धक्का लावायचा नाही." एवढे आश्वासन मिळाल्यावर

का नाही शेतकरी निर्धास्तपणाने त्यांचे उद्योग चालविणार ! हे सारे शेतकरी आतिथ्यशीलही दिसले. आमच्या भुकेच्या वेळी आम्ही एखाद्या गावात खाण्यापिण्याचे पदार्थ मिळतील काय ? अशी विचारणा केली की तेथील माणसे अगत्याने त्यांच्याजवळ जे काही असेल ते आम्हाला भरपूर देत. परंतु खाण्यापिण्याच्या बाबतीत मात्र माझे एकंदरीत हालच झाले असे म्हटले पाहिजे. बहुतेक सगळीकडे डाळ, रोटी आणि भात असेच तीन पदार्थ घेत. हे तीनही पदार्थ आमच्या नेहमीपेक्षा वेगळया रीतीने तयार केले जात त्यामुळे मला त्यांची नवी चव बिल्कूल पसंतीस येत नसे. डाळ या पदार्थाच्या तिखटपणाचा मी इतका धसका घेतला होता की त्या डाळीत दुप्पट पाणी ओतून मी ' सूप ' बनवूनच ते कसेबसे पीत असे. जेथे शक्य असेल तेथे ' तिखट अजिबात वापरू नका ' अशी विनंती करीत असे. तिखटा ऐवजी मिऱ्यांची पूड मी वापरी, ब्रेड किंवा भाकरी जी मिळे ती कधी कधी तांदळाचीच असे तर कधीकधी गव्हाच्या कणकेचे जाड रोट असत. या दोन्ही गोष्टी माझ्या पोटाच्या दृष्टीने त्रासदायकच वाटत. एकंदरीत माझ्या वेगळया रंगाचे, वेगळया पोषाखाचे वेगळया भाषेचे, वेगळया राहणीचे कुतूहल लोकांना फार वाटे. त्यामुळे मोठया बाप्या गडयांचा आमच्या भोवती सदैव घोळका असेच आणि बारीक सारीक पोरे तर आमच्या भोवती कायमचीच ठाण मांडून राहिलेली असत. त्यामुळे जेवणखाण्याची आम्हाला फारशी पंचाईत किंवा फिकीर करावी लागली नाही.

जेवल्यानंतर आम्ही लगेच पैसे काढून देत असू. कित्येक गावांतून ते त्यांनी घेण्याचे नाकारलेच. पाहुण्यांना जेवण देणे ही धर्माची गोष्ट

असल्याचे त्यांनी सांगितले. अनेक गावांतून आम्हाला आधीच जेवणाचा दर सांगितला गेला. कित्येक ठिकाणी दूध वा अंडी विकत मिळाली. एक दोन ठिकाणी मांसही मिळू शकले. पण इथल्या पद्धतीप्रमाणे तळलेले अथवा शिजवलेले मांस खाण्याची मला पूर्वी वेळच आली नव्हती. आमच्याप्रमाणे मांस भाजण्याची पद्धत येथे जवळजवळ अस्तित्वात नाहीच असे मला आढळून आले. तथापि हे अपरिचित सामिष पदार्थ मला मोठे रुचकर लागले हे नमूद केलेच पाहिजे.



पण क्वचित एखाद्या गावी असा अनुभव येई की आमच्या वेगळेपणामुळे किंवा कसल्या धास्तीमुळे आम्हाला खाण्याचा एक कणसुद्धा मिळू शकत नसे. वाटेल तेवढे पैसे देऊ केले तरी सर्वत्र नन्नाचा पाढा.

दूध नाही, डाळ नाही, रोटी नाही, मिठाईच्या दुकानातला एकही पदार्थ नाही–आमची रिकामी पोटे जाड जाड कातडी कंबरपटयांनी गच्च आवळून घेऊन पुढे कूच करणेच आम्हाला भाग पडे. अनुभवांनी सकाळी पहाटे लवकर निघून एक दोन प्रहरांनंतर जे गाव लागेल तेथे थांबायचे. दिवसभर तिथेच काढायचा आणि सूर्य मावळायला आला की तेथून मुक्काम हलवून पुढे दोन तीन तास प्रवास करायचा व पुढचे ठिकाण गाठायचे असे धोरण आम्ही ठेवले होते. त्यामुळे दिवसाच्या तापलेल्या वेळात घोडयांना भरपूर विश्रांती मिळून थंड आणि उत्साही वातावरणात आमच्याप्रमाणेच तीही उमेदीने प्रवास करू शकत असत. त्यांची खाण्यापिण्याची आबाळ मात्र आम्ही केव्हाही केली नाही.

दोन वेळा पहाडातल्या रस्त्यात वाटमाऱ्या जमावाशी आमची गाठ पडली होती. पण दोन्ही वेळा आमच्या धैर्यामुळेच आम्ही त्यांतून सहीसलामत बाहेर पडलो. डोंगराच्या चढणीउतरणीवर एखाद्या अरुंद वाटेवर मोक्याच्या ठिकाणी पाच सहा माणसे हाती तलवार, भाला, कुऱ्हाड असे एखादे शस्त्र घेऊन बसलेली असत. एखाद दुसरा वाटसरू दिसला की त्याला घेरून दम देऊन त्याच्या जवळ असेल नसेल ते काढून घ्यायचे हा त्यांचा उद्योग. तो प्रसंग दोन वेळा आमच्यावरही आला परंतु त्या वेळी मी चटकन एक पिस्तुल गोपाळ जवळ दिले आणि एक माझ्या हातात तयार ठेवले. त्यांनी कावकाव करायला सुरुवात केली आवाज चढवून मी ओरडलो, "खबरदार !" आणि जरबेच्या भाषेतच पुढे गोपाळने दम देऊन सांगितले की, "हे पाहा शिवाजी राजाच्या बोलावण्यावरून आम्ही जातो आहोत. आमच्या जवळ ऐवज किंवा संपत्ती

काही नाही. उगाच आमच्या भानगडीत पडू नका. तुम्हाला लाभ तर काहीच व्हावयाचा नाही. पण दोन चार जणांचे मुडदे मात्र पडतील. आमच्या पिस्तुलात गोळ्या भरलेल्या आहेत. आम्ही तर जिवावर उदार झालेलेच आहोत. प्रत्येकाला एकदा मरायचे असते. पण तुमच्यांपैकी निदान दोघा तिघांचा जीव घेतल्याशिवाय आम्ही सुखासुखी मरणार नाही हे लक्षात घ्या. आणि मगच पुढे पाऊल टाका."

आमची ही धमकी खरी ठरण्याची खात्री पटल्यामुळे असो, वा आमच्याकडून काही लभ्यांश मिळण्याची शक्यता वाटत नसल्यामुळे असो, दोन्ही वेळा त्या लुटारूंनी मागच्या मागे काढता पाय घेतला आणि आम्हाला निर्वेध मार्ग करून दिला.

ह्या असल्या तऱ्हेतऱ्हेच्या विविध अनुभवांमुळे आमचा प्रवास अगदी अविस्मरणीय असाच ठरला. हे सर्व अनुभव मला अगदी नवीन, प्रथमच वाट्यास आलेले होते. माणसांच्या स्वभावाच्या किती विविध तऱ्हा पाहावयास मिळाल्या. त्या सर्वांवरून एक निष्कर्ष मी काढू शकलो. 'माणूस मग तो इंडियातला असो की इंग्लंड मधला असो, वा आणखी कोणत्या देशातला असो, तो इधून तिथून सर्वत्र सारखाच असतो. तो लबाड असतो, भाबडा असतो, वेरकी असतो, भोळाही असतो. अंतःप्रवृत्ती ह्या सर्वत्र सारख्याच. माणूस जातीचे सामुदायिक मनही सगळीकडे सारखेच. केवळ बारा पंधरा दिवसांच्या या आगळ्या प्रवासाने मी खूपच काही शिकलो."

निसर्गात मात्र या एकतेऐवजी बरीच विविधता मला आढळून आली. माझ्या मायदेशाचे हवामान आणि सुरतेचे हवामान यांत केवढा फरक.

सुरतेचा प्रदेश, आणि शिवाजीचा हा प्रदेश यांतही केवढी तफावत. सुरत सोडून बाहेर पडलो तेव्हा समोवार सारा सपाट विस्तीर्ण प्रदेश होता, क्वचित एखादे टेकाड मधूनच डोके वर काढीत आहे असे दिसे. नंतर काही दिवसांनी पूर्व क्षितिजावर निळया निळया डोंगरांची अस्पष्ट ओळच्या ओळ दिसू लागली. त्याच डोंगरश्रेणीचे आडवे आडवे फाटे मधून मधून आमच्या मार्गात येऊ लागले. अनेक लहान मोठे कोरडे वा पाण्याने भरलेले जलप्रवाह आम्ही ओलांडले. त्या पर्वतराजीला सामोरे गेलो. अनेकदा ते उत्तुंग डोंगर चढून ओलांडावेही लागले. सरळ भिंती-सारखे उभेच्या उभे तुटलेले खोल खोल कडे आणि पाताळापर्यंत खोल गेलेल्या दऱ्या निसर्गाचे हे चित्तथरारक आणि भीषण दर्शन येथे मला प्रथमच घडत होते. केवढेही प्रचंड सैन्य या प्रदेशात आले तरी शिवा-जीला काहीही धोका पोहोचणे शक्य नाही अशी जी दर्पोक्ती मी ऐकली होती ती शंभर टक्के खरी होती अशी माझी खात्री पटली. या प्रदेशातून ये जा करणारी तट्टेही लहानखुरी आणि काटकच असणे आवश्यक होते. आमच्या अस्सल इंग्लिश अथवा अरबी घोडयांची मिजास येथे क्षणा-र्धात उतरली असती हे नक्कीच.

बारा दिवस अशा अद्भुत प्रवासात घालविल्यानंतर महाड नावाच्या गावाच्या अलीकडे शिवाजीच्या सुरतेहून परतलेल्या लुटीच्या तांडयाला आम्ही एकदाचे गाठले. एक उंच टेकडी चढून आम्ही वर आलो तो पलीकडे तळातून हा तांडाच्या तांडा हळूहळू वाटचाल करीत असलेला आम्हाला दिसला. त्याच्यात आणि आमच्यामध्ये मैल, दीड मैलांचे अंतर असले तरी पुढे पन्नास साठ घोडेस्वारांचा जमाव, मधून सुमारे बारा बैलगाडयांची

माळच्या माळ चाललेली आणि त्यांच्या पाठीमागेही असाच घोडेस्वारांचा जमाव, असे एखाद्या चित्रातल्याप्रमाणे दृश्य मला दिसले. आम्ही झपाट्याने दौड करीत त्या तांडयाला गाठण्याकरिता निघालो. मागाहून येणाऱ्या आमच्याकडे त्यांचे लक्ष जाताच त्यांच्यापैकी पंधरावीस स्वारांनी आपली तोंडे फिरवली आणि ते आमच्या सर्व बाजूनी घेराव करून उभे राहिले.

आम्ही दोघांनीही आमची पिस्तुले काढून बळकट धरून ठेवली व त्यांच्या हालचालीवर पक्की नजर देऊन पाहू लागलो. हे सर्व भरदार, धिप्पाड क्रूर आणि राकट भासणारे शिपाई गडी होते. त्यांच्या भरघोस मिशांमुळे ते अधिकच उग्र वाटत, कानात गोल कडयांचे इयरिंग, डोक्याला पिळापिळाची लालभडक पागोटी, कमरेला तलवार, पाठीशी ढाल आणि उंच खोवलेला भाला अशा त्या यमदूतांच्या गराडयात आमचा काय निभाव लागणार होता !

" कोण तुम्ही ? कोठून आलात ? कोठे चाललात ? हत्यारं खाली करा अगोदर " त्यांच्यापैकी एकाने जरबेच्या सुरात आम्हाला दरडावले " आम्हाला शिवाजी राजाकडं जायचं आहे ! तुम्ही वाटलं तर आम्हाला ताब्यात ध्या. तुमचे कैदी म्हणूनही आम्ही गडावर यायला तयार आहोत पण आमच्या सुरक्षिततेची खात्री पटल्याशिवाय आम्ही हत्यारे सोडणार नाही. मग बेहेत्तर आहे आमचा इथंच जीव गेला तरी. मात्र जबरीने हत्यारे काढून घेणार असाल तर आमच्या प्रमाणेच तुमच्यापैकीही काही जणांचे मुडदे पडल्याशिवाय राहणार नाहीत " मीही धिटाईने उत्तर दिले. " शिवाजी राजाकडेच आम्ही चाललो आहोत आणि आम्हाला

खुशाल कैद करून गडावर न्या " असे म्हटल्यावर त्यांनी त्यांच्या हवालदाराला बोलावले तो पुष्कळच सौम्यपणाने बोलला. तो म्हणाला, " तुम्ही जरूर आमच्याबरोबर गडावर चला. परंतु परक्या माणसाला परवानगीशिवाय गडावर जवळ हत्यार बाळगता येत नाही. इथला नियमच तसा आहे. तेव्हा आता जरी तुम्ही हत्यारे द्यायचे नाकारलेत तरी गडाच्या दरवाज्यावर ती तुमच्याकडून काढून घेतली जातीलच." "तेव्हाचे तेव्हा बघू ! तोवर तरी आमची आमच्या जवळच असलेली बरी " असं मी उत्तर दिलं. पुढे त्यांच्या संमतीने त्यांच्यापैकीच एक बनून अगदी खेळीमेळीच्या वातावरणात आमचा पुढचा प्रवास पार पडला.

समोर उंचच्या उंच व सपाट माथ्याचा प्रचंड डोंगर दिसत होता तोच रायगड ! मराठ्यांच्या राज्याची राजधानी. त्याचा उंचपणा, भव्यपणा, अवघडपणा क्षणाक्षणाला अधिकाधिक तीव्रतेने नजरेत भरत होता. पायथ्याशी आल्यावर तर तो थेट स्वर्गातच घुसल्याप्रमाणे वाटू लागला. पायथ्यापासून उंचच उंच एक टेकडी चढून आम्ही पाचाड या ठिकाणी आलो. गडावरच्या सर्व सोयीची तजवीज येथे आधी केली जाते. घोड्यांच्या पागा, धान्याची कोठारे, अधिकाऱ्यांच्या कचेऱ्या अशी सगळी व्यवस्था येथे आहे. इतरांप्रमाणे आम्हीही घोड्यावरून खाली उतरताच हवालदाराने, " त्रिंबकपंत, अहो त्रिंबकपंत " अशी जोरात हाक दिली. पांढरेशुभ्र आणि गाडीच्या चाकाप्रमाणे गोल आडवे असे पागोटे डोक्यावर घातलेला एक माणूस बाहेर आला. " हं, हे पाव्हणं घ्या तुमच्या ताब्यात पुढच्या व्यवस्थेसाठी " असे हवालदाराने त्याला सांगितले. इतरांच्या घोड्यांप्रमाणेच आमची तट्टेही मोतदारांनी धरून पागेत नेली.

गोपाळाने काही सांगताच " त्यांची योग्य ती काळजी आम्ही घेऊ " असे त्रिंबकपंताने सांगितले व आम्हाला घेऊन तो त्याच्या ऑफिसात गेला. थोडया वेळाने शामजी निराजी म्हणून एक दुभाषा आला. इंग्रजी भाषा जाणणारा समोर आहे हे कळताच मी भडाभडा अनेक गोष्टी मोकळेपणाने बोलून टाकल्या. राजाच्या शौर्याची मी खुबीदार प्रशंसा करून राजाचे दर्शन घेण्याची उत्सुकता दाखवली. शिवाय इतरांच्या दृष्टीने क्षुल्लक असणारा पण आमच्या घराण्याची इभ्रत सांगणारा आमचा छोटासा करंडक परत मागावा हाही माझा हेतू मी सांगितला. दुभाषाने मला अधूनमधून प्रश्न विचारून योग्य त्या माहितीचा एक अर्ज माझ्याकडून लिहून घेतला. " तो गडावर पाठवून उत्तर येईल त्याप्रमाणे तुमची व्यवस्था करू " असे त्रिंबकपंताने आम्हांला सांगितले. शेजारीच एक खोली देऊन तेथे राहण्याची आम्हाला आज्ञा केली. " एक तासाभराने सायंकाळचे जेवण देऊ. तोवर आराम करा. आणि खोलीच्या बाहेर एकटे जायचा प्रयत्न करू नका " असे तो म्हणाला. आमचे ईप्सित साध्य झाल्याच्या आनंदात त्या रात्री मी गाढ झोपून गेलो.

प्रकरण पाचवे

## निराशेचा घनांधकार

दुसऱ्या दिवशी सकाळी जरा उशिराच माझ्या अर्जाचा जबाब आला. त्यात " ताबडतोब गडावर दाखल होऊन सुरनीस आनाजी दत्तो यांना भेटावे म्हणजे कामाचा निकाल लागेल व महाराजांच्या भेटीचा दिवस कळविणेत येईल " असे लिहून आले होते. तेव्हा ताबडतोब चार हत्यारबंद शिपायांच्या समागमे आम्ही पाचाडेहून गडावर जाण्यासाठी निघालो.

आमच्यासमोरच डोंगराच्या एका नाकाडावर एक भक्कम बुरूज बांधलेला असून त्यावर चार शिपायांचा जागता पहारा होता. ह्या बुरजाच्या पाठीशीच सरळ उभ्या भिंतीचा ताशीव कडा होता. त्याचे वरचे टोक थेट ढगांत घुसल्याप्रमाणे दिसत होते. त्या बुरजाच्या पायथ्याजवळूनच गडावर जाण्याची वाट होती. एक छोटासाच परंतु कठीण असा चढ चढून व पुढे काहीसे उतरून थोडे सरळ गेल्यावर आम्ही गडाच्या पहिल्या दरवाज्यापाशी आलो. नियमाप्रमाणे येथेच आमच्याजवळची सर्व हत्यारे काढून घेतली गेली. मीही हत्यारे देण्यास विरोध केला नाही. कारण विरोध करून काय उपयोग होता ? एक तर यापुढे आम्ही गडाच्या संरक्षित भागात होतो. आमच्या बंदोबस्तासाठी शिपायांची नजर होतीच तेव्हा कसल्याही धोक्याची शक्यता धरण्यात काही अर्थ नव्हता. आणि अगदी टोकाला जाऊन बोलायचे तर जर शिवाजीने

आमचा शेवटच करायचे ठरवले असते तर त्याच्या शस्त्रसज्ज सैनिकांच्या बंदुका, तरवारी, नि तोफा यांच्यापुढे आमच्या दोघांच्या हत्यारांचा काय पाड लागणार होता ? म्हणून हत्यारे मुकाट्याने देण्यातच मला शहाणपणा वाटला. हा दरवाजा ओलांडून पुढे गेल्यावर उभ्या कडयाच्या तळाशी असणाऱ्या पाऊलवाटेनेच पुढे जावे लागले. जेमतेम चार पाच फूट रुंदीची ही वाट आहे. उजव्या हाताला दोन अडीचशे फूट सरळ उंचच्या उंच असलेल्या कडयाची नैसर्गिक दगडी भिंत आहे. तिच्याकडे डोळे वर करून पाहवतही नाही. बरं पाहिलं तर ती आपल्याच अंगावर कोसळून पडत आहे की काय अशी भीती वाटून मला क्षणभर चक्करच आली. डाव्या बाजूला पाहिले तर तशीच सरळच्या सरळ खोल दरी अंगाला थरकाप आणीत होती. गडावर जाण्यासाठी ही एकच्या एकच वाट आहे हे समजल्यानंतर अशा अजिंक्य व दुर्गम जागी आपले वसती-स्थान करण्याची बुद्धी व ती योजना यशस्वी करणारे कारागीर यांच्या बुद्धीचे किती कौतुक करावे नि किती नाही असे होऊन जाते. सुमारे अर्धा मैल अशा भयप्रद वाटेने आम्ही चालून गेल्यावर वाट एकदम रुंद झाली. त्या कडयातच कडा फोडून काढून आत वळण घेणाऱ्या प्रशस्त चिरेबंदी दगडी पायऱ्या दिसू लागल्या. पायऱ्यांच्या टोकाशी वरच्या बाजूला भव्य दगडी प्रवेशद्वार होते. त्याच्या दोन्ही बाजूंला सत्तर फूट उंचीचे अष्टकोनाकृती प्रचंड बुरूज होते. हा महाकाय कमानीचा दरवाजा बघणाऱ्याला एकदम स्तिमित करतो. या दरवाज्याला महादरवाजा असेच नाव असून ते अगदी सार्थ आहे अशी खात्री पटते. मी वर पाहिले. दरवाज्यावर असणाऱ्या ध्वजस्तंभावर मराठयांचा प्रसिद्ध भगवा झेंडा अस्मानात फडफडत होता. प्रवेशद्वाराच्या बाहेर दोन्ही बाजूंला हातात नंगी समशेर

धरलेले दोन पहारेकरी होते. माझ्या बरोबरच्या शिपायांनी त्यांना माझ्याबद्दल काहीतरी सांगितले. तो दरवाजा ओलांडून आम्ही आत गेलो. दरवाज्याच्या आत दोन्ही बाजूंला मोठ्या ओवऱ्या असून पाच सहा शिपाई तेथे आरामात बसले होते. प्रवेशद्वार बांधण्यापुरताच कड्याचा भाग पोखरून काढला असल्यामुळे दारातून आत गेले तरी पायऱ्यांची चढण चढतच जावे लागते. तेवढी चढण चढत आम्ही डोंगराच्या पृष्ठभागावर आलो. वर पाहताच जिकडे तिकडे प्रशस्त वाडे व इमारती, कचेऱ्या, यांची गर्दीच गर्दी दिसून आली. एखादे गाव ऐसपैस वसलेले असावे अशी वस्ती तेथे वाटली. इतर सृष्टीपासून अलग असलेली ही अद्भुत सृष्टी, ही राजधानी इतक्या उंचीवर असल्यामुळे पक्षिराज गरुडाच्या घरट्याप्रमाणेच ती मला भासली. मनात विचार आला, ‘ कोणाही मानवी शत्रूला हा किल्ला जिंकता येईल काय ? ती गोष्ट अशक्यच. ह्या किल्ल्याला शत्रू दोन. एक म्हणजे दुष्काळ आणि दुसरा म्हणजे फितुरी. ’

वर आल्यानंतर प्रथम आम्हांला गडाचे कारभारी मंत्री आनाजी दत्तो यांच्याकडे नेण्यात आले. त्यांनी दुभाषाकरवी माझे सर्व म्हणणे सविस्तर ऐकून घेतले. मला राजाला प्रत्यक्ष पाहावयाचे आहे आणि एका करंडकाची मागणी करावयाची आहे हे ऐकल्यावर त्यांनी विचारले, “ राजाला ‘ नजर ’ देण्यासाठी तुम्ही काय आणले आहे ? कारण इकडच्या रिवाजाप्रमाणे राजाला अथवा राजाच्या प्रधानाला आधी नजराणा द्यावा लागतो. त्या शिवाय त्यांची मुलाखत ठरवता येणार नाही. नजराण्यासहित तुमचा अर्ज त्यांच्याकडे पेश केल्यावर मग ते देतील त्यावेळी तुम्हाला मुलाखतीला नेले जाईल. एकदम राजाकडे जाऊन तुम्हांला तशी मागणी करता येणार नाही. ”

हा मोठा प्रश्नच होता. हे असले काही त्रांगडे असेल याची मला कल्पनाही नव्हती. राजाच्या भेटीस जाताना योग्य तो नजराणा बरोबर घेतला पाहिजे हे मला पटले. पण माझ्याजवळ तसे काय होते ? मी तर सडाफटिंग शिपाई गडी, हाती काहीच नाही. मी काय नजराणा देणार ? माझ्या मनात माझ्या पिस्तुलाचा विचार आला. इंडियामधल्या सर्वच राजांना आम्ही बंदुका आणि दारूगोळा विकतो. पिस्तुल ही चीज त्यांना अद्याप सर्रास वापरण्याइतकी सलगीची झालेली नाही. त्याची अजून तरी अपूर्वाईच वाटते मग एक पिस्तुलच राजाला भेट म्हणून दिले तर? "....पण तो फार दरिद्री आणि भाबडा विचार झाला. मी उघड म्हटले " महाराज ! मला या रिवाजांची अद्याप काहीही माहिती नाही. मी व्यक्तिशः माझ्या धडपडीने येथे आलो. कंपनीतर्फे कामगिरीवर आलो असतो तर हे सर्व रिवाज कंपनीतर्फे खात्रीने पाळले गेले असते, मला परक्या माणसाला हे कोठून माहीत असणार ? करंडक परत मिळणार असेल तर त्यासाठी बदल्यात योग्य ती किंमत किंवा वस्तूंची भरपाई मी कबूल केली असती किंवा करणार आहेच. परंतु ती गोष्ट-सुद्धा आता इथल्या इथं पुरी करणे माझ्या हातात नाही. तेव्हा मी याबाबत काय करू शकेन ? तुम्हीच काहीतरी मार्ग काढावा अशी माझी विनंती आहे. "

" मग कठीण काम आहे. " तो मान हलवीत म्हणाला. पण थोडा वेळ थांबल्यानंतर त्याने सांगितले, " एक शक्यता आहे. आणखी दोन दिवसांनी—बहुधा परवाच्या दिवशीच—दरबार भरवला जाईल. सुरतेहून आणलेली सर्व लूट सर्वांना पाहण्यासाठी त्या दिवशी दरबारात मांडायची आहे. इतर कोणीही नागरिक त्या दरबारात प्रेक्षक म्हणून

येऊ शकतात त्यावेळी तेथे हजर राहण्याची तुम्हाला मुभा दिली जाईल. दरबारचा एक भाग म्हणून तुमची मुलाखत वगैरे ठरवता येणे अशक्य आहे. परंतु सर्वसामान्य प्रेक्षक म्हणून तुम्ही तेथे हजर राहा. त्यावेळी जर महाराजांचे तुमच्याकडे लक्ष गेले आणि त्यांनी होऊन तुम्हाला बोलावले तर मग कसल्याही औपचारिक रीतिरिवाजाविना तुम्ही समक्ष त्यांच्याशी बोलू शकाल. दरबारातील सर्वसामान्यांची, विशेषत: अपरिचित माणसांची, विचारपूस करणे ही महाराजांची रीतच आहे. तशी संधी तुला मिळाली तर फारच बरं होईल. पण तो तुझ्या नशिबाचा भाग आहे. महाराजांचे लक्षच गेले नाही किंवा त्यांनी दखल घेतली नाही तर मात्र कोणालाच दोष देता येणार नाही. ''

परंतु हा नशिबाचा भाग असला तरी यशस्वी होण्याचा तोच एक सर्वोत्तम उपाय असल्याचे मी जाणून होतो. माझे वेगळेपण चटकन नजरेत भरणारे, कुतूहल वाढवणारे असे होते याचा अनुभव इथवरच्या प्रवासात मी भरपूर घेतला होता. त्या सर्वसामान्य प्रवृत्तीला हा राजा अपवाद असणार नाही असाच मी कयास केला, आणि आनाजी दत्तो यांनी सुचविलेल्या उपायाला आमची संमती दिली. आनाजींनी ताबडतोब हाताखालच्या ब्राह्मण कारकुनाला काही सूचना केल्या.

दुभाषामार्फत मला सांगितले, '' ब्राह्मणाबरोबर जा. तुमची राहण्याची आणि जेवणाखाणाची सोय केलेली आहे. तात्पुरते पाहुणे म्हणून तुम्हाला वागविले जाईल. परंतु तुम्ही बंधनात आहात. तुमच्यावर नजर ठेवली जाईल हे विसरू नका. या कारकुनाच्या मदतीने आणि संमतीने तुम्ही इकडे तिकडे वावरू शकाल. आमच्या सूचना आणि निरोप योग्य वेळी त्याच्यामार्फतच तुम्हाला मिळतील आणि ते तुम्हाला ऐकावे

लागतील. " होय " म्हणून मुकाटयाने मान डोलवण्याशिवाय आम्हाला गत्यंतरच नव्हते.

सुमारे तीन एक फर्लांग चालून गेल्यावर आम्ही एका लांबलचक बैठया इमारतीपाशी आलो. एक मजली आठ फूट उंचीची आणि शंभर एक फूट लांबीची ती इमारत होती. त्या सैनिकांच्या कोठडया म्हणून वापरात असाव्यात. कारण अनेक लहान लहान खोल्या तेथे निर्माण केल्या होत्या आणि त्यांपैकी कित्येकांतून मराठे शिपाई राहतही होते. इमारत संपताच काटकोनात त्या ब्राह्मण कारकुनाचे घर होते. तेही एक मजलीच परंतु दोन तीन मोठया खोल्यांचे होते. शिपायांच्या कोठडयातल्या पैकीच एक खोली आम्हांला देण्यात आली. खोलीत एक चारपायी खाट होती. आणखीही दुसरी एक चारपायी खोलीच्या बाहेर आणून ठेवण्यात आली. खोलीत पाणी भरून ठेवलेली मातीची एक घागर होती, पाणी पिण्यासाठी पितळेचे एक भांडे होते. एका कोपऱ्यात भिंतीला कडया ठोकून दिवटी किंवा मशाल अडकवून ठेवण्याची सोय केलेली होती. एक विझलेली मशालही तेथे होती आणि तो कोपरा काजळीने काळाकुट्ट होऊन गेला होता. आमच्या सभोवतीच्या ' बराकी'-तून शिपाई वावरत होतेच. कोणी प्रत्यक्ष बोलले नाही वा त्रासही दिला नाही, परंतु आमच्यावर त्यांची बारीक नजर होती हे मात्र जाणवल्या-वाचून राहिले नाही. दोन थाळयांमधून डाळभाताचे जेवण आम्हांला देण्यात आले व त्या थाळया आमच्या खोलीत आमच्याजवळच ठवण्यास सांगितले गेले.

दुपारी सूर्य कलल्यावर ऊन अगदी सौम्य झाले आणि सावल्या लांबच लांब होऊ लागल्या तेव्हा गड पाहण्यासाठी त्या ब्राह्मण कार-

कुनाबरोबर आम्ही बाहेर पडलो. तो बहुतेक सर्व बडबड फारशी भाषेतून करत होता. गोपाळाला ती चांगलीच समजत होती व सुरतेत दोन वर्षे वापरल्यामुळे मलाही थोडी बहुत उमगत होती. सर्व बोलणे नसले तरी एकंदर भावार्थ लक्षात येत होता. गडाची सर्व माहिती तो सांगत होता. गडावर सुमारे दोन हजार शिबंदी आहे. दोन अडीचशे इमारती आहेत. गडाच्या पायथ्याशी 'वाडी' म्हणून एक गाव आहे. पाचाड म्हणून वस्ती आहे. तेथेच गडावर लागणाऱ्या सर्व वस्तू साठवून ठेवल्या जात व जरुरीप्रमाणे गडावर आणल्या जात. धान्याच्या पेठा म्हणून निजामपूर आणि महाड या दोन गावांचा उपयोग करण्यात येतो. पावसाळ्यात चार महिने मुसळधार पाऊस पडतो त्यावेळी बहुतेक वस्ती हलवून खाली न्यावी लागते. कारण घरातून बाहेर पडणे देखील मुष्किल होते. सर्व घरांच्या भिंती आणि छपरे शेवाळाने माखून हिरवीगार झालेली असतात. तो कारकून सांगत होता. "पक्ष्यांच्या पंखांवर देखील शेवाळ उगवलेले असते." मला त्याच्या अतिशयोक्तीची मोठी मौज वाटली. आम्ही टकमक टोक पाहिले. गुन्हेगारांचा कडेलोट करण्यासाठी त्या टोकाचा उपयोग करतात. टोकावरून दोन हजार फूट सरळ खोल अंतर आहे. परंतु टोकापर्यंत आम्ही पोहोचू शकलोच नाही. कारण तेथे वारा इतका विलक्षण वाहत होता की अंगावरच्या कपड्यात हवा गच्च फुगून जाऊन माणूस सुद्धा उडून जाऊ शकेल असेच वाटत होते आणि ते खरेही ठरण्याची शक्यता होती तेव्हा उगीच विषाची परीक्षा पाहा कशाला ? आम्ही तेथूनच परत फिरलो. परत आल्यानंतर राजाचे वास्तव्य असणाऱ्या राजवाड्याला वळसा घालून आम्ही गडावरच्या प्रशस्त तलावाजवळ पोहचलो. ह्या वेळेपर्यंत सूर्य क्षितिजाखाली गेला होता.

तलावातून पाणी भरण्यासाठी डोक्यावर घागरी घेतलेल्या अनेक स्त्रियांची ये जा सुरू असलेली दिसत होती. त्यांपैकी एकदोघींशी काहीतरी बोलल्यावर कारकून एकदम थबकून म्हणाला, " तिथंच थांबा. आज महाराज तलावावर आहेत. तुम्हाला बघायचे असतील तर दाखवण्याची काहीतरी सोय करतो. त्यांच्या समोर आपणाला जाता येणार नाही. " असे म्हणून तो योग्य त्या आडोशाची जागा शोधू लागला.

' राजा शिवाजी ! " ज्याच्या भेटीकरता आजवर एवढी धडपड केली त्याचे पहिले दर्शन घडण्याचा तो क्षण ! अफझलखानासारख्या बलाढ्य राक्षसाचा कोथळा बाहेर काढणारा ! गुन्हेगारांचे हातपाय धडाधड तोडणारा, काहीही दयामाया न दाखवता एकेका घावासरशी मुंडकी धडावेगळी करणारा तो दगाबाज, क्रूरकर्मा शिवाजी आता प्रत्यक्ष नजरेला पडणार होता. मी अतिउत्कंठित झालो होतो. एक आडदांड, उंचा पुरा, भरगच्च दाढीमिशांचा, कठोर चेहऱ्याचा आणि क्रूर नजरेचा शिवाजी आपल्या तशाच शोभणाऱ्या पाच सहा अनुयायांसह दृष्टीस पडणार असे एक चित्र माझ्या डोळ्यांसमोर उभे राहिले. तेवढ्यात त्या कारकुनाने " शुक् ! शुक् ! " करीत हलक्या आवाजात आम्हांला बोलावले. एका घराच्या आडोशाला तो उभा होता—आम्ही त्याच्याजवळ जाताच तो म्हणाला " माझ्या मागून या ! " घाई गोंधळ न करता, आवाज होऊ न देता आम्ही दबत दबत चालून घराची भिंत पार करून गेलो. भिंती पलीकडे एका मोठा खडक होता आणि खडकाच्या पलीकडच्या बाजूनी एक उंच झाड वाढून विस्तारले होते. त्या खडकाच्या आड उभे राहून आम्ही हळूच आमची डोकी वर काढली. झाडांच्या फांद्या आणि पाने यांच्या आड असल्यामुळे आमचे अस्तित्व कोणालाच जाणवणारे नव्हते.

उलट आम्हांला मात्र अडथळ्याविना समोरचे दृश्य स्पष्टपणे पाहता येत होते. “ ते पाहा. खाली खडकावर बसले आहेत तेच महाराज. ” कारकुनाने कानात कुजबुजून सांगितले. “ हा शिवाजी ? ” “ हा किरकोळ शरीरयष्टीचा सामान्य माणूस शिवाजी आहे ? छे, छे. ” माझा विश्वासच बसेना. कल्पनेतल्या चित्राचा फुटून चक्काचूर झाला होता. प्रत्यक्षातला हा शिवाजी मध्यम उंचीचा आणि बळकट बांध्याचा एक सामान्य माणूस दिसत होता. तो अति सौम्य दिसत होता. धारदार नाक, पाणीदार डोळे, भव्य कपाळ, डोक्यावर रुळणारे व मानेपर्यंत आलेले काळेभोर केस, काहीशा विरळ भासणाऱ्या पण टोकदार मिशा आणि हनुवटीखाली टोक असणारी निमुळती छोटी दाढी, यांमुळे हा माणूस कमालीचा सौम्य आणि आकर्षक वाटत होता. त्याचे बोलणे सौम्य होते, नजर सौम्य होती, हसणे सौम्य होते. तो हसला किंवा त्याने मान वळवली की त्याच्या कानातील रिंगला जडवलेल्या टपोऱ्या मोत्यांची फार मजेशीर हालचाल होई त्यामुळे त्याचा चेहरा फारच आकर्षक वाटे. एक सैलसर पांढरा साधा अंगरखा त्याने घातला होता. अंगावर एक जाकीट, डोक्यावरची छोटीशी पगडी काढून शेजारीच बाजूला ठेवलेली, पायात चुण्याचुण्यांची विजार, असा त्याचा पोषाख होता. त्याच्याजवळ कोणी शरीररक्षक नव्हते; ना कोणी अनुयायी. एका प्रशस्त अशा खडकावर तो आरामशीर बसला होता. आणि पाण्यासाठी आलेल्या स्त्रियांची अगदी घरगुती मोकळेपणाने चौकशी करत होता. त्यांच्या नवऱ्यांची, मुलाबाळांची, भावाबहिणींची, माहेराची खुशाली विचारत होता. मधून मधून मुक्तपणे हसतही होता. त्या स्त्रियाही प्रसन्न मुद्रेने त्याला उत्तरे देत होत्या. कधी त्याची थट्टा मस्करी केली की त्या ज्या

झटक्याने मान फिरवून पदर ओढून लाजत. ते सारे चित्र मला फार विलोभनीय वाटले. एखाद्या बाईच्या कडेवर असलेल्या लहान मुलाचा गालगुच्चा घेऊन जवळ ठेवलेल्या टोपलीतले एखादे फळ तो त्या लहानग्या बाळाच्या हाती देत असे. त्यासाठीच बहुधा, फळांनी भरलेली एक टोपली त्याच्या शेजारी ठेवलेली होती. अनेक लहान लहान मुले मुली आपल्या आयांसह तेथे आली होती. ती सारी त्याच्याभोवती खुशाल बागडत होती आणि तोही प्रत्येकाच्या हातात एक एक फळ देत होता. ' छे ! माझ्या कल्पनेच्या अगदी विरुद्ध जाणारे पण खरे खरे असे हे दृश्य होते. इतका कनवाळू आणि प्रेमळ माणूस क्रूरात्मा दरोडेखोर असेलच कसा ? अफझलखानाचा कोथळा बाहेर काढायला हा खरोखरच धजला होता काय ? पण त्याच वेळी मला आठवले, ' आमच्या वखारीत असणाऱ्या स्मिथने, एकदा ह्या राजाने कठोरपणे घावावर घाव घालून तिघांची मस्तके क्षणार्धात धडावेगळी केल्याचे राजापुरला प्रत्यक्ष पाहिल्याचे त्याने मला सांगितले होते. शत्रूंना तो कसाही कर्दनकाळ असो, प्रजेला मात्र तो सर्वतोपरी काळजी घेणारा बापच असल्याप्रमाणे वाटतो असे म्हटले जाते ते नक्कीच खरे असले पाहिजे अशी माझी खात्री पटली. कितीतरी वेळ अनिमिष नेत्रांनी मी ते दृश्य पाहत बसलो असतो परंतु कारकुनाने खुणावून आम्हाला बाजूला घेतले. बाहेर बराच अंधार दाटून आला होता. आणि एक अनपेक्षित, अपूर्व असा अनुभव मनात साठवूनच मी निवासस्थानाकडे परतत होतो.

त्यानंतर राजाचे दर्शन झाले ते दुसऱ्या दिवशी दरबारात. दुसऱ्या दिवशी सकाळीच घरातून बाहेर कचेरीत जाण्यासाठी निघताना कारकुनाने सांगितले, " आज दुपारी तिसऱ्या प्रहरात दरबार भरेल. तुम्ही तयार

असा. मी तुम्हाला घेऊन जाईन." तेव्हापासून त्या क्षणाची प्रतीक्षा करीतच मी वेळ काढला होता.

दुपारी बोलावणे येताच मी आणि गोपाळ कारकुनाबरोबर राजवाडयात गेलो. राजाच्या भव्य वाडयाच्याच एका दालनात–प्रशस्त अशा दिवाण-खान्यात हा दरबार भरला होता. दिवाणखान्याची लांबी सुमारे साठ फूट आणि रुंदी चाळीस फुटांपर्यंत असेल. मध्यभागी सुमारे १५ फुटांचे एक दालन आणि बाजूला दहा ते पंधरा फुटांची दोन दालने असे एकूण रुंदीचे तीन भाग पाडले होते. जाड, घेरेदार, नक्षीच्या भव्य लाकडी खांबांनी ही विभागणी केली होती. त्या खांबांवर तशाच नक्षीदार कमानी होत्या. वर छताला काचेचे लोलक असलेली मोठी झुंबरे टांगली होती. त्यांत असंख्य मेणबत्त्या पेटवलेल्या असल्यामुळे मधल्या दालनात झगझगीत उजेड पडला होता. हा दिवाणखाना पूर्वाभिमुखी होता. राजाची जागा पश्चिम बाजूला होती आणि दक्षिण उत्तरेच्या दोन्ही भिंतींना वरच्या भागात मोठमोठया खिडक्या असल्यामुळे वाऱ्याचा त्रास न होता भरपूर उजेड मात्र येत होता. पश्चिम बाजूला पाच फूट उंचीचा एक मोठा सलग प्लॅटफॉर्मसारखा उंचवटा होता. त्यावर मध्यभागी राजाची बैठक–ज्याला इथे गादी असे म्हणतात–ती मांडली होती. आमच्या पद्धतीप्रमाणे ती खुर्ची नसून प्रशस्त लांब आणि अगदी कमी उंचीचे ते एक टेबल होते व त्याला मागील बाजूस उंच उभी पाठ होती. सुवर्णाच्या पत्र्यांनी ही गादी किंवा हे आसन मढवले होते. त्यावर चित्रविचित्र नक्षी कोरली होती. पाठीमागे दोन्ही बाजूने काही धार्मिक सुवर्णचिन्हे लटकत होती आणि टोकाशी वर एक छोटासा तराजू बसवला होता. बैठकीसाठी मखमलीच्या गाद्या, उशा आणि गिरद्या यांची योजना केली होती. मधल्या दालनात खांबांना

लागूनच गाद्या घातल्या असून टेकायला लोड ठेवले होते. मधले दालन इराणी गालिचे घालून सजवले होते तर बाजूच्या दोन्ही दालनांत जाड जाड सतरंज्या घातल्या होत्या. राजाच्या गादीलगतच दोन्ही बाजूंना अशाच गाद्या व लोड मांडले होते. आम्ही गेलो त्यावेळी दरबारात माणसे येण्यास सुरुवात झाली होती. जे खास मानकरी आहेत, जेधे, बांदल, देशपांडे, ते ते आल्यावर त्यांच्या त्यांच्या जागांवर मधल्या दालनातील गाद्यांवर जाऊन बसले. शिवाजीराजाचे प्रधान वरच्या पडवीत राजाच्या गादीशेजारी आपापल्या जागी बसले आणि इतरेजन ( ज्यांत आमचाही समावेश होता ) दोन्ही बाजूंच्या दालनात उभे राहिले. आजचा दरबार विशेष असा नव्हता त्यामुळे अवघी शंभर–सव्वाशेच माणसे हजर होती. शिवाजी राजा सर्वांत शेवटी येई त्यामुळे तो येईपर्यंतच्या वेळात कारकुनाने मला मुख्यप्रधान मोरोपंत पिंगळे, सचिव आबाजी सोनदेव, सुभेदार तानाजी मालुसरे व इतर मानकरी अशा ठळक ठळक व्यक्ती मुद्दाम दाखवल्या.

थोड्याच वेळात भालदार चोपदारांनी ललकाऱ्या देत राजा आल्याची वर्दी दिली. सर्वजण उठून उभे राहिले. त्या गर्दीत मागच्या बाजूने राजा केव्हा आला आणि गादीवर केव्हा बसला ते मला कळलेही नाही. सर्वांनीच खाली वाकून त्रिवार मुजरे केले आणि राजाने बसण्यास सांगितल्यावर पहिल्याप्रमाणेच ज्यांनी त्यांनी बसून घेतले. दरबारास सुरुवात झाली. कालच्यापेक्षा राजाचा आजचा पोषाख अधिक झगझगीत होता. आजचे त्याचे पागोटे पिळापिळाचेच होते, ते उंच टोकदार आणि एका वेगळयाच पद्धतीने बांधले होते. त्याच्या टोकाशी एक पिसांचा झुबका आणि मोत्यांचा लोंबणारा लांबलचक गोंडा होता. कपाळावर लाल

भडक टिळा, गळ्यात मोत्यांच्या माळा, कालच्यापेक्षा आज राजा अधिकच तेजस्वी दिसत होता. दरबाराला सुरुवात झाली. पंतप्रधान मोरोपंतानी काही पत्रक वाचून दाखवले आणि राजाला संमती विचारली त्याने मान हलवल्यावर लगेच आतून दोन दोन माणसांनी रुमालांनी झाकलेली एक एक मोठी कढई आणून दिवाणखान्यात मध्यावर ठेवण्यास सुरुवात केली. अशा एकूण दहा कढया आणून ठेवल्यावर त्यांच्यावरील रुमाल काढून घेतले तोच त्यातील खजिना एकदम झगमगू लागला. ही सारी सुरतेची लूट होती. मोहोरा, रुपये व इतर सर्व नाणी यांची वेगळी मोजदाद होऊन ते केव्हाच सरकारी खजिन्यात जमा झाले होते. आणि आता बाकीचे दागिने अलंकार, हिरे मोती रत्ने—इतर जडावाच्या वस्तू या सर्व वस्तूंची वेगवेगळी वर्गवारी करून एकेका कढईत ती वेगवेगळी ठेवून लोकांना पाहण्यासाठी येथे मांडून ठेवली होती. मी धडपडत पुढे झालो. माझ्या करंडकाचा शोध घेत घेत माझी नजर सर्व कढयावरून सारखी भिरभिरू लागली. दरबारचे काय काम चालले होते इकडे माझे लक्षच नव्हते. दागिने वा अलंकारांच्या ऐवजी इतर वस्तूंच्या साठयाकडेच मी फार बारकाईने पाहत होतो. शोध घेत होतो. अखेर आमचा करंडक मला दिसलाच. तो आमचाच आहे हे मला जाणवले. दुसरा कोणताही करंडक त्या सगळया ढिगाऱ्यांतून नव्हताच, ‘ सापडला. करंडक सापडला. ’ मी आणखी थोडे पुढे घुसून पाहिले; तोच तो !

या वेळेपर्यंत ज्यांनी सुरतेच्या लुटीत चांगली कामगिरी केली होती त्यांना राजाने इनामे दिली. ते ते पुढे येऊन वाकून मुजरा करून आपापले इनाम घेऊन जात होते. ते काम बहुतेक संपत आले होते; पण माझ्या करंडकाच्याच शोधात मी असल्यामुळे माझे इतर गोष्टींकडे

मुळीच लक्ष गेले नव्हते. राजाचे मात्र माझ्या धडपडीकडे लक्ष वेधले होते कारण मुख्य काम संपताच, मी कोण आहे ! अशी चौकशी करून त्याने मला पुढे बोलावले. आनाजी दत्तो उठून उभे राहिले. दुभाषा निराजी शेणवी पुढे आला. आनाजीनी माझी माहिती सांगताच, " तुला काय हवे ? " असे राजाने विचारले.

माझी रसवंती स्रवू लागली. मी म्हटले, " बलाढय मुघल साम्राज्याला ज्यांनी आपल्या पराक्रमाने नमवले आहे अशा महापुरुषाचे दर्शन घ्यावे म्हणून मी इतक्या लांबवर आलो आहे. तसाच दुसराही महत्त्वाचा माझा हेतू असा आहे की आमच्या घराण्याची इभ्रत सांगणारी महत्त्वाची, पण आपल्या दृष्टीने एक क्षुद्र अशी छोटीशी वस्तू आमचा एक करंडक– चुकीने या लुटीबरोबर येथे आला आहे. तेवढा आपण दयावंत होऊन परत करावा अशा आपल्या चरणांपाशी माझा नम्र अर्ज आहे."

" तुला तो इथं कुठं आढळला काय ? दिसला आहे का ?" राजाने विचारले. " होय महाराज ! हा पाहा तो दुर्दैवी करंडक."
मी नेमक्या ठिकाणी जाऊन तो करंडक उचलून घेऊन राजाला दाखवला. आनाजीनी तो हाती घेऊन न्याहाळून पाहिला. त्यावरची इंग्रजी अक्षरे पाहून राजाच्या हाती दिला. राजानेही एकदा तो नीट पाहून हातांत खेळवत खेळवत मला विचारले, " समजा हा करंडक आम्ही परत दिला तर त्याच्या बदल्यात तू काय देऊ करशील ?" मी गडबडलो. काय बोलणार ? तरी पण धीर करून म्हटले, " महाराज ! मी पामर ! आपण जे सांगाल ते देण्याची आम्ही कोशीस करू. परंतु एखाद्या वाण्याच्या सौदाप्रमाणे घासाघीस करून हा व्यवहार व्हावा काय ? दयार्द्रतेने तो देऊन टाकणे हेच आपल्या कीर्तीला शोभणार नाही काय ?

मला शेक्स्पिअरच्या ओळीची आठवण झाली. मी पुढे बोलू लागलो "महाराज ! आमच्या एका सुप्रसिद्ध कवीने म्हटले आहे की "सम्राटांनी



केलेली अपेक्षाविरहित सत्कृत्ये हीच त्यांच्या राजमुकुटापेक्षा अधिक चिरकाल टिकणारी असतात."

राजा त्यावर गदगदून हसला व म्हणाला, 'पण तरुण माणसा ! केवळ कविकल्पनांवर जगाचा व्यवहार चालत नसतो. ह्या येथे समोर मांडलेल्या प्रत्येक गोष्टीच्या कणाकणावर—माझा नव्हे माझ्या प्रजेचा हक्क आहे. प्रजेच्या संमतीविना एक पैही उचलण्याचा मला अधिकार नाही. तुला काय वाटते, "केवळ चैन म्हणून, गंमत म्हणून आम्ही सुरत लुटून आणली काय ?" ज्या मुघल फौजांनी दोन दोन तीन तीन वर्षं माझ्या मुल-

खात राहून प्रदेशाची नासाडी केली, अश्राप प्रजेच्या तोंडचा घास काढून घेतला त्याची भरपाई करण्यासाठीच तर मला हा मार्ग पत्करावा लागला. त्यात सुद्धा कोणावरही अन्याय होऊ नये म्हणून मी जास्तीत जास्त काळजी घेतली. तुम्हा फिरंगी लोकांच्या मालमत्तेला मी बोटही लावले नाही. तीन दिवस सुरतेत माझं राज्य चालू होतं. मला काहीही अशक्य नव्हतं. परंतु तुम्हा परकीयांना उपद्रव व्हायचा नाही अशी मी सक्त ताकीद देऊन ठेवली होती. अशा परिस्थितीत तुमची लूट झाली, चूक झाली, अन्याय झाला हे मी कधीही मान्य करणार नाही, सुक्याबरोबर ओलंही जळतंच. त्याला नाइलाज असतो. म्हणून, केवळ भावनावशतेने तुझी मागणी मजूर करणे मला अशक्य आहे. तू धैर्याने येथपर्यंत येण्याची धडपड केलीस त्याबद्दल मी तुझं कौतुक करतो. तुला परत जाताना माझ्या सैनिकांचा उपद्रव मुळीच होणार नाही अशी व्यवस्थाही मी करतो. यापेक्षा मी तुझ्याकरिता जास्त काहीही करू शकणार नाही. ''

राजाने स्वच्छ रोखठोक शब्दात मला जबाब दिला. माझी सर्व स्वप्नं भंगून गेली. आशा धुळीस मिळाल्या. खिन्न मनानं दरबार संपताच मी बाहेर पडलो. गोपाळही निराश झाला, दुर्दैव आमचं ! दुसरं काय ? त्याच दिवशी सायंकाळी कारकुनाने आनाजी दत्तोकडून राजाची आज्ञा म्हणून सांगितले, ' आणखी दोन दिवस फक्त गडावर राहता येईल. तिसऱ्या दिवशी गड सोडावा लागेल. '' संपले सारे ! निराशेच्या घनांधकारात मी खोलखोल बुडून गेलो.

# अद्‌भुत समर

दुसरा दिवस उजाडला तोच मुळी मंद आणि निरुत्साही होऊनच. आता गडावरच्या आमच्या राहण्याला काही अर्थच नव्हता. गोपाळा काहीच बोलत नव्हता. आमची सफर पूर्णपणे फसली हे तो जाणून होता. त्यामुळे काहीतरी बोलून मला आणखी निराश करण्याऐवजी माझ्या कलानेच घ्यावे म्हणूनही तो गप्प बसला असावा. मी मात्र तीन दिवसांची राजाने दिलेली सवलत पूर्णपणे उपभोगण्याचे ठरविले. न जाणो, अगदी शेवटच्या घटकेला राजाचा विचार कदाचित बदलेलही अशीही सुप्त आशा त्या मागे होतीच. तेव्हा शेवटपर्यंत गडावर राहावयाचेच असा माझा विचार पक्का झाला.

आणि मग मी ओढून ताणून थोडासा जादा उत्साह आणून आजूबाजूच्या वातावरणाशी समरस होण्याचा प्रयत्न करू लागलो. जो ब्राह्मण कारकून आमच्या व्यवस्थेसाठी नेमला होता त्याचे ह्या वेळेपर्यंत मी नावही विचारून घेतले नव्हते त्याला नुसतेच सर, महाशय, असे मी म्हणत होतो. आज त्याची मुद्दाम अधिक ओळख करून घेतली. त्याचे नाव येसाजी त्रिमल असे होते. त्याच्या मुलाबाळांची चौकशी केली. त्याला सहा वर्षांची एक मुलगी आणि चार वर्षांचा मुलगा होता. त्याची बायको मात्र मला घराच्या बाहेर कधीच दिसली नव्हती. सकाळीच

त्याच्या दाराच्या समोर असलेल्या एका छोटया नक्षीदार स्मारक स्तंभा-भोवती त्याच्या मुलीने पाणी शिंपडले; पांढऱ्या शुभ्र पावडरीने तिने काही चित्रविचित्र आकृत्या काढल्यानंतर त्या स्तंभाच्या मध्यभागी उगवलेल्या रोपटयाला फुले वगैरे वाहून त्याची पूजा केली. ते सारे मी कुतूहलाने पाहत राहिलो. ती पावडर पांढऱ्या दगडाची असते हे मला नंतर सांगितले गेले. दोन बोटांच्या चिमटीत धरून ती बालिका पावडरीच्या इतक्या झरझर रेघा काढी की माझे आश्चर्य अधिकच वाढून मीही तसा प्रयोग करून पाहिल्याशिवाय राहिलो नाही. त्रिमलने मला सांगितले की ते रोप तुळस नावाच्या वनस्पतीचे आहे. प्रत्येक हिंदू ती वनस्पती फार पवित्र मानतो आणि रोज तिची पूजा केल्याशिवाय राहत नाही. आमच्याही धर्मात आम्हो अशा वनस्पती पवित्र मानतो हे साम्य आठवल्यावर सर्वच धर्मात मूळ संकेत सारखेच असावेत आणि एकाच मानवी प्रेरणेतून निघाले असावेत अशी जाणीव मात्र मला त्यावेळी झाली.

गोपाळा आज आळसावला होता. कदाचित आजवरच्या प्रवासाचा ताण खाण्यापिण्यातील, हवा पाण्यातील फरक यामुळे त्याला बेचैन वाटत असावे. सुरतेच्या मानाने रायगडावर फार थंड होते आणि रात्री तर कडाक्याची थंडी पडे. हा बदलही गोपाळाला बाधला असावा. तो आज सर्व दिवस चारपायीवर पडूनच होता. संध्याकाळी बाहेर जाण्यासाठी मी त्याला बळेबळे उठविले पण तो म्हणाला, “ आज तू एकटाच जा. मला फार कंटाळा आला आहे. ” “ अच्छा ! तू पडून राहा ! मी एकटाच थोडं हिंडून येतो. ” असे म्हणत मी एकटाच अंगणातून कुंपणाच्या बाहेर पडलो. तोच “ अहो साहेब ! अहो पाव्हणे ! थांबा ! थांबा ! ! एकटेच बाहेर पडू नका.” असे म्हणत येसाजी त्याच्या दारातून

डोकावत ओरडला. मी चरफडलो. पण त्याचेही बरोबर होते. चटदिशी डोक्यावर पागोटे ठेवून अंगरख्याचे बंद बांधीत बांधीत तो पायात चढाव सरकवीत बाहेर पडला. म्हणाला, "एकटेच बाहेर सापडलात तर माझ्यावर ठपका येईलच पण तुम्हालाही कोठडीत बंद करून ठेवलं जाईल. उगीच एका दुसऱ्या दिवसासाठी का संकट ओढवून घेता ? तुम्ही सुखरूपपणे गडाखाली उतरलात की तुम्ही सुटलात आणि आम्ही सुटलो." आणि तेच खरे नव्हते काय ?

आज आम्ही राजवाडा उजव्या हातास सोडून गडाची दक्षिण बाजू पाहावयाचे ठरविले. त्या बाजूने पश्चिमेकडील टोकावर जाऊन सूर्यास्त पाहिला. गडावरून सूर्यास्त पाहण्याचा हा शेवटचाच प्रसंग ! कारण उद्या ह्या वेळेपर्यंत आमची खानगी खाली पाचाडला होण्याचीच फार शक्यता मला वाटत होती. त्यामुळे आताच्या वेळेत जास्तीत जास्त फिरावयाचे आणि पाहावयाचे असे मी ठरविले. सूर्यास्त झाला तरी अजून एक तासभर तरी संधिप्रकाश राहणार होता त्याचा फायदा मी घेऊ इच्छीत होतो. आम्ही ज्या वाटेने जात होतो त्या बाजूला राहण्याची वस्ती फारशी नव्हती. कैद्यांच्या अंधारकोठड्या, एक तलाव, दारूची कोठारे इतर एक दोन कचेऱ्या, एवढे सोडले तर बहुतेक शुकशुकाटच होता. त्रिमलपंत मला तळातला दूर पर्यंतचा प्रदेश दाखवीत होता. पूर्वेकडचे काही किल्ले त्यांने दाखविले. समोर दिसणारे महाड गाव दाखवले. झाडी व अस्पष्ट दिसणारी घरे यांमुळे ते मी थोडेफार ओळखू शकलो. आम्ही ज्या वाटेने आलो त्या रस्त्यावर अधून मधून हालचाली दिसत. ते लमाणांचे तांडे मला घेऊन पाचाडला येत आहेत असे त्याने सांगितले. अशा रीतीने सर्वत्र पाहत, अधूनमधून थबकत थांबत आम्ही

जात होतो. पावसाळयात उंचच उंच उगवलेले गवत सर्वत्र होते. ते पूर्ण वाळून गेले होते तरी उभेच होते आणि त्यामधूनच आमची पायवाट जात होती. एका मोठया थोरल्या खडकाशेजारी कसलेतरी एक झाड होते आणि त्या झाडाची वाळन पडलेली एक सरळच्या सरळ फांदी माझ्या दृष्टीस पडली. "वा ! काय झकास आहे !" असे म्हणत मी ती उचलून घेतली. एक टोक चांगले जाडजूड भक्कम तर दुसरी बाजू सरळ निमुळती होत गेलेली होती. अशी पाच फूट लांबीची काठी एरव्ही मुद्दाम शोधू म्हटले तरी अशक्यच. मी ती मोठया हौसेने आणि अधीरपणाने घेतली. येसाजी त्रिमलला हसत हसत विचारलं, "पाहा हो! मला शस्त्र बाळगायला इथं बंदी आहे. तेव्हा ही काठी घेतली म्हणून तुम्ही अटकावणार तर नाही ना !" त्यानेही हसूनच प्रत्युत्तर केले, "घ्या, खुशाल घ्या. जायच्या वेळी परत आम्हाला द्या म्हणजे झालं." ती काठी हाती येताच माझ्या अंगात वीरश्री संचारली आणि बाजूला असणाऱ्या उभ्या गवतावर सपासप वार करीत त्याला आडवे झोपवत मी पुढे चाललो.

आमची वाट सपाटीवरून नव्हती. खडकाळ होती. अधूनमधून थोडे-फार उंचवटे चढून उतरावे लागत. आजूबाजूला रातकिडे किरकिरू लागले होते. आकाशातील तांबडया रंगाची छटा किंचित काळवंडली होती. अशा वेळी आमच्या पुढे दोन एकशे पावलांवर एक माणूस आपल्याच तंद्रीत सावकाश चाललेला आम्हाला दिसला. त्याच्याकडे कुतूहलाने लक्ष देण्याचे काहीच कारण नव्हते. परंतु थोडयाच वेळात त्याच्या मागू-नच गवतातून जरा उंच झालेली तीन डोकी मला दिसली. ती तीन माणसे बहुधा पुढे जाणाऱ्या माणसाचा पाठलाग करीत असावीत, मधूनच

त्यांच्यापैकी कोणाच्यातरी तलवारीचे टोक वर आलेले दिसले. आम्ही थबकून पाहू लागलो. खात्रीने त्यापुढे जाणाऱ्या माणसाचाच पाठलाग होत होता. तिघांच्याही जवळ तलवारी होत्या. मी त्रिमलपंताला म्हटले, " काही तरी दगा आहे ! तू माघारी जाऊन लोकांना मदतीला बोलाव. तोवर मी त्यांना ओरडून थोपवतो. " आमच्याजवळ काहीच शस्त्र नव्हते. त्यामुळे हत्यारबंद शिपाई आणणे हेच करायला हवे होते. त्रिमल-पंताला ते पटले, व तो दौडतच माघारी वळला. मी ही हातातली काठी सरसावत झपाट्याने त्यांच्या माझ्यामधले अंतर कमी कमी करत चाललो होतो. सपाट जागेत आल्यावर त्यांनीही आपला वेग वाढविला.

पुढे जाणाऱ्या माणसाच्या मागे वीस-पंचवीस पावलांवर आल्याबरोबर त्यांनी आपल्या तलवारी सरसावल्या; तेवढ्यात त्यापुढच्या माणसाचे मागे लक्ष गेले आणि हा अचानक येणारा हल्ला पाहून त्याने झटकन अंगा-वरचे घोंगडीसारखे पांघरलेले वस्त्र काढून फेकले व क्षणार्धात आपली तलवार उपसून घेतली. हे होईपर्यंत मीही जोरात धावलो आणि " हेऽऽ " करीत जोराने ओरडून अगदी मागच्या माणसाच्या अंगावर माझी काठी सरसावून वेगाने तडाखा दिला. " एक, दोन, तीन, " मी सपासपा प्रहार करीत सुटलो.

मागून अशा प्रकाराने अनपेक्षितपणे हल्ला होईल ही कल्पनाच त्यांना नव्हती. ज्याच्यावर मी तडाखे दिले तो हत्यारी उन्मळून खाली कोस-ळला. त्यामुळे त्याच्या सोबत्याला धक्काच बसला. कारण आता दोन विरूद्ध दोन अशी लढाई होती. मजजवळ एका काठीशिवाय दुसरे शस्त्र नाही हे पाहताच त्याला चेव आला आणि त्याने त्वेषाने त्याची तलवार एकदम माझ्या बरगडीत खुपसली. केवळ नशीब म्हणून ती माझ्या जाड

लोकरी ओव्हरकोटाच्या कुशीतून आरपार बाहेर आली आणि तो माझ्या अगदी निकट आला. मी माझ्या सोटयाने त्याच्या जबडयावर खालून जोरात ठोसे देत असतानाच " आऽ " असे ओरडन त्याने तलवारीची पकड सोडून दिली व माझा गळा धरला. आमचे द्वंद्व सुरू झाले. मी खाली वाकून त्याला कमरेत धरून पुढे ओढले त्यामुळे त्याला सावरण्याची कल्पना येण्यापूर्वीच तो धाडकन पाठीवर आपटला व मी त्याच्या अंगाच्या वर आलो. आता मी स्वार होतो. त्याने माझा गळा पकडला होता खरा पण मी दोन्ही पायांनी त्याला जाम दाबून ठेवले होते. आणि हातांनी त्याचे केस धरून धाडझाड त्याचे डोके जमिनीवर आपटत होतो. काही वेळ तो निपचित पडून राही अन् मग पुन्हा धडपडीला सुरुवात होई. मी फक्त त्याला खिळवून धरले होते. माझ्या मानाने तो भलताच आडदांड गडी होता. त्यामुळे त्याला आवरता आवरता मी पार घामाघूम होऊन डबडबून गेलो होतो. माझे तग धरणे संपुष्टात येत चालले होते. पण परिस्थिती मला अनुकूल होती त्यामुळे आम्ही दोघेही दम खात खात एकमेकांवर कुरघोडी करण्याच्या प्रयत्नात होतो.

त्या अधूनमधून उद्भवणाऱ्या स्तब्ध क्षणांतच मला शेजारी चालू असलेले दुसरे तलवारीचे द्वंद्व पाहता येत होते. तो मराठा शिपाई लहान खुरा होता. पण त्याच्या हालचाली जास्त सफाईच्या होत्या. त्याचे हात शरीराच्या मानाने लांब होते. त्याची तलवार ही बारीक पण अधिक लांब होती. ती विजेसारखी लखलखत होती तर कधी नागिणीसारखी सळसळत असे. त्याच्या तळपत्या तलवारीमुळे समोरच्या शत्रूला प्रहार करायची संधीच मिळत नसे. अखेरीस बऱ्याच वेळानंतर असा वार करण्याची शक्यता वाटताच शत्रूने अगदी चिडून जोराने वार केला पण तेवढयात

तो मराठा शिपाई चटकन् डाव्या बाजूस झुकून आपली तरवार त्याने इतक्या सफाईने आणि वेगाने आडवी फिरवली की त्याच्या कानाखाली मानेवर काडकन आवाज करीत ती मानेच्या हाडावर आदळली. शत्रू तसाच धप्पकन पालथा पडला. मानेतून रक्ताच्या चिरकांडया उडाल्या आणि त्याचे शिर बाजूला लोंबकळत पडले. त्याचा असा निकाल लागताच तो शिपाई माझ्याकडे वळला.

त्याची ओळख पटताच मी एकदम चमकलो. शिवाजी ? राजा शिवाजी ? मी काही चुकत नाही ना ? पण छे ! चूक होत नव्हती. कालच तासभर ज्याला पुरेपूर न्याहाळला, ज्याच्याबरोबर बराच वेळ संभाषण केले, त्या माणसाला ओळखण्याच्या बाबतीत मी चुकेन कसा ? " महाराज ! आपण ? " असे म्हणून राजाला आदर दाखविण्यासाठी किंचित उठण्याची मी हालचाल केली, परंतु त्या सैलपणाचा माझ्या अंगाखालच्या माणसाने फायदा घेतला. मला हिसडा मारून, उसळी घेऊन तो उठला व तसाच शिवाजीच्या रोखाने धावला. त्याच्या हाती शस्त्र नव्हते म्हणून तो शिवाजीला तसाच भिडायला पाहत होता, पण शिवाजीने त्याच्या अंगावर प्रहारावर प्रहार करून आपल्या तलवारीचे टोक त्याच्या छातीला भिडवले व तो त्याला मागे मागे रेटू लागला. एवढया वेळात मीही सावरलो. त्याची बाजूला पडलेली तलवार उचलून माझ्या हाती घेतली व शिवाजीच्या मदतीसाठी पाऊल पुढे घातले. आता पुढे काय होणार याची त्याला जाणीव झाली. दोघांविरुद्ध शस्त्रहीन अवस्थेत त्याला झुंज घ्यावी लागणार होती. मी त्याला भिडण्याच्या आतच निकराचा प्रयत्न करायचे त्याने ठरवले असावे. किंचित मागे सरून जोराने उसळी घ्यायची आणि हाताने ते तलवार बाजूला करीत शिवाजीच्या अंगावर उडी घ्यायची अशा

विचाराने तो जोरात मागे सरला आणि...आणि...तसाच्या तसाच पायाचा आधार सुटून सरळ खालच्या दरीत कोसळला. हा अद्‌भुत प्रकार काय घडत आहे हे आमचे आम्हालाच कळलेही नाही. मागे तोल गेल्यानंतर आमच्या समोरून दरीत खाली जाणाऱ्या त्या माणसाच्या विस्फारित डोळ्यामुळे भयानक बनलेला चेहरा माझ्या डोळ्यांपुढून कधीही हलणार नाही.



किती झटपट हा प्रकार घडून आला ! अवघ्या पाच सात मिनिटांचा प्रकार पण तेवढयात केवढे अद्‌भुत समर घडले होते. तलवार म्यान करत शिवाजी माझ्याकडे आला. दोन्ही हात पसरून त्याने मला आलिंगन दिले आणि माझ्या पाठीवर थोपटत तो म्हणाला, " शूर इंग्रज तरुणा ! तुझ्यामुळेच आज माझा जीव वाचला आहे. " त्याला पुढे बोलवेना. तो मला तसाच पाठीवर थोपटत राहिला. एवढया वेळात येसाजी त्रिमलपंत आणि

तलवारी घेतलेले दहा शिपाई धावतपळत आमच्या जवळ येऊन पोहो-चलेही. समोर खुद्द त्यांचा राजा पाहताच त्यांनाही आश्चर्याचा धक्का बसला. शिवाजीनेच त्यांना काय प्रकार घडला तो थोडक्यात सांगितला. तो म्हणाला, " या इंग्रज माणसाची लाठी जणू काय भीमाची गदाच झाली आणि तिने एवढा पराक्रम केला. " माझा हात हातात घेऊन तो त्याच्या शिपायांना म्हणाला, " बाबांनो, केवळ याच्या पराक्रमानेच हे सर्व काही घडून आले." शिपायांनीही ते मान्य करून रोषाने म्हटले, " पण महाराज ! कोणाला न सांगता सवरता तुम्ही-यावेळी एकटेच इकडे का आलात ? वेळ काही सांगून येते थोडीच ?"

" होय तेही खरंच !" राजा म्हणाला, " आणि यापुढं तशी काळजीही घेतली जाईल. तथापि कशीही वेळ आली तरी आईभवानी पाठ राखून काहीही वेडेवाकडे घडू देणार नाही अशी माझी खात्री आहे. आता, हेच पाहा ना ! ह्या परक्या माणसाच्या रूपानं देवच साहाय्याला आला असं नाही का तुम्हाला वाटतं ? आपलं राज्य इथं व्हावं, म्हणून जगदंबा आणि शंभू महादेव काळजी करायला बसलेत ना ? ते तुमच्या राजाला असं फुकाफुकी मरण येऊ देणार नाहीत. " पुढं तो माझ्याकडे वळला आणि हात पुढे करीत म्हणाला, " हे फिरंगी तरुणा ! खरोखरी आज तू आमच्या राज्याला फारच मोलाचे साह्य केले आहेस. तू इंग्रज, मी मराठा, हे भेदभाव पूर्णपणे विसरून आपण मित्र म्हणून मोकळेपणाने भेटू या. " असे म्हणून अस्सल इंग्लिश पद्धतीप्रमाणे त्याने माझ्याशी हस्तांदोलन केले. तो पुन्हा पुढे म्हणाला, " उद्या तू जरूर दरबारात ये आणि तुझ्या इच्छेप्रमाणे पाहिजे ते मागून घे. तुझी मागणी नाकारणे आता मला शक्यच होणार नाही. माझा देश तुझा कायमचा ऋणी आहे. "

त्याने शिपायांना त्या पडलेल्या दोघाजणांची पुढची व्यवस्था करण्यास त्याने सांगितले. एकतर नुसतेच कलेवर होते आणि दुसराही मुडद्या-सारखाच पडला होता. तो बेशुद्ध होता. त्याला बहुधा, जबर वर्मी मार बसला असावा. तो शुद्धीवर आला तर या हल्ल्यामागच्या कारणांचा उलगडा होऊ शकेल म्हणून त्याला उचलून घेऊन वैद्यांच्या हवाली करण्यास त्याने फर्माविले. आम्ही सर्वच बोलत बोलत माघारी वळलो. अंधार बराच झाला होता. टेंबे आणि पलिते घेऊन आमच्या शोधासाठी आणखीही दहा पंधरा-जण तेथे आले होते. त्यांच्याबरोबर आम्ही परत आलो. राजवाड्याजवळ येताच राजा पुन्हा एकदा माझा हात हातात घेऊन म्हणाला, "उद्या भेटायचं आहे हं जरूर ! !" तो त्याच्या वाड्यात वळला आणि आम्ही दोघे एका मशालजीसह आमच्या कोठडीकडे वळलो.

**प्रकरण सातवे**

## भाग्याची बरसात

कालचा दिवस आणि आजचा दिवस ! केवढे महदंतर ! ! एक निराशेने काळवंडलेला तर दुसरा आनंदाने फुलून आलेला ! काल मी दुर्दैवाच्या खोल गर्तेत होतो. आज सुखाच्या उच्च शिखरावर विहरत होतो. काल माझ्याकडे कुत्रेही ढुंकून पाहत नव्हते. आज प्रत्येकजणच मला पाहायला आसुसलेला होता. प्रत्येकजण आपला आनंद माझ्याजवळ व्यक्त करण्यासाठी धडपडत होता. अभिनंदनाचा वर्षाव आज जिंकून

तिकडून माझ्यावर होत होता. सकाळपासूनच त्याचे प्रत्यंतर येऊ लागले.

सकाळी राजाचे मुख्यप्रधान मोरोपंत पिंगळे आणि तितकेच महत्त्वाचे दुसरे कारभारी आबाजी सोनदेव हे दोघेही आपण होऊन माझी भेट घेण्यासाठी मुद्दाम आले. त्यांनी कालच्या माझ्या कामगिरीबद्दल माझे अभिनंदन केले आणि आज दुपारी होणाऱ्या दरबारासाठी मला विशेष आमंत्रण दिले. येसाजी त्रिमललाही त्यांनी आम्हाला वेळेवर दरबारात घेऊन येण्यासाठी फर्माविले. तो अगदी अदबीने हात जोडून त्यांच्यापुढे वाकला होता. अनेक अनोळखी ठिकाणांहून आम्हाला मिठाया व फळे यांच्या छोटया छोटया करंडया भेट म्हणून येऊ लागल्या. जो येई तो नमस्कार करून, करंडी आमच्याजवळ देऊन तो उपाहार स्वीकारण्याविषयी अदबीने सांगे. दोघातिघांनी काळे तपकिरी गोल गोल लाडू आमच्या हातात देऊन प्रेमाने आमचे हात दाबले. त्या दिवसांतील ती विशेष भेट असल्याचे त्यांनी सांगितले. जानेवारी महिन्यांत हिंदूंचा एक सण असतो. सूर्याने मकर राशीत प्रवेश करण्याचा दिवस ते सणासारखा मानतात. त्याला ' संक्रांत ' असे नाव आहे. त्या दिवशी तीळ आणि गूळ हे पदार्थ मुद्दाम खायचे असतात. सर्व हिंदू एकमेकांना तीळ आणि गूळ देतात. व ' गोड बोला ' असे सांगतात. त्या दिवसापर्यंत चालू असलेली पूर्वीची भांडणे आणि वैरे विसरून नव्याने मैत्री प्रस्थापित करावयाची असते. ही चाल मला फारच उपयुक्त वाटली. मीही त्यानंतर मला भेटणाऱ्या प्रत्येक माणसाला " तीळगूळ घ्या गोड बोला " असे म्हणू लागलो. त्याची सर्वांना विशेष गंमत वाटे.

हे सर्व पाहिल्यानंतर काल माझ्याबरोबर फिरायला बाहेर न पडल्या-

बद्दल गोपाळाला फार हळहळ वाटू लागली, की एक फार मोठी संधी त्याने हुकवली असे त्याला वाटले. पण नंतर तोच म्हणाला की, जे घडायचे तेच होत असते. न जाणो तो माझ्याबरोबर आला असता आणि काहीही अद्‌भुत न घडताच आम्ही परत आलो असतो म्हणजे .... ! तेव्हा ' काय झाले त्याबद्दल हळहळण्यात काही अर्थ नाही. ' त्याचे त्याने असे समाधान करून घेतले. गडाचे कारभारी आनाजी दत्तो यांच्या कचेरीत जाऊन मी मुद्दाम त्यांची भेट घेतली. माझी काढून घेतलेली पिस्तुले मला परत देण्याविषयी मी मागणी केली. मी ती दोन्ही पिस्तुले राजाला नजर करू इच्छीत असल्याचे सांगितले. त्यांनी तात्काळ माझ्या मागणीला होकार दिला हे वेगळे सांगावयास नकोच. त्या दिवशी जेवणात मला मुद्दाम कोंबडी देण्यात आली. शिवाय इतर विशेष गोड पदार्थ होतेच. रोजच्या डाळ-भात-रोटी ह्या आहाराला वैतागून गेलेल्या मी त्या दिवशी तृप्त होऊन भरपोट जेवण केले.

येसाजी त्रिमलपंताने मुद्दाम येऊन कालच्या त्या वेशुद्ध माणसाबद्दल पुढची हकीगत सांगितली. तो सकाळी शुद्धीवर आला. त्याच्या दोन्ही मित्रांना यमसदनास पाठविले व तो एकटाच मराठयांच्या हातात सापडला आहे हे पाहून त्याने सर्व कट काय होता ते मुकाट्याने सांगितले. ते तिघेजण मुसलमान असून विजापुरच्या आदिलशहाचे नोकर होते. शिवाजीला गुप्तपणाने गाठून मारण्याच्या कामगिरीवरच त्यांची योजना झाली होती. विजापुरातून हाकलले गेल्याचा बहाणा करून ते शिवाजी-कडे आले. आपल्याला ' सैनिक म्हणून नोकरीत घ्यावे ' अशी त्यांनी शिवाजीकडे विनंती केली होती. आठच दिवसांपूर्वी त्यांना नोकरी देऊन पुढचा हुकूम मिळेपर्यंत गडावरच राहण्यास फर्मावले होते. ते सर्व

आळीपाळीने शिवाजीच्याच पाळतीवर असून योग्य त्या संधीची वाट पाहत होते. अखेर काल शिवाजीमहाराज एकटेच बाहेर पडल्याचे पाहून त्यांनी खबरदारीने बरोबर वेळ गाठली...." "त्या माणसाचे आता काय करणार ?" मी चौकशी केली. "कडेलोट किंवा तोफेच्या तोंडी !" हाच त्याचा शेवट आता ठरला आहे. बहुधा एक दोन दिवसांतच ती गोष्ट होईल." कारकून म्हणाला.

दुपारी आम्ही दरबारात जाण्यासाठी निघालो तेव्हा आजूबाजूच्या सर्वांच्या नजरा मजवरच लागलेल्या होत्या. जो तो अस्फुट हास्याने माझे स्वागत करी किंवा 'सलाम', म्हणून मला अभिवादन करी. मीही हाताने अभिवादन करून त्यांना प्रत्युत्तर देई. परवाच्याच दिवाणखान्यात आम्ही आलो. मोरोपंत पिंगळे व इतर मंत्री मुद्दाम मला सामोरे आले. आज मध्यभागच्या दालनात विशेष आसन देऊन माझी जागा योजली होती. परवाच्या दिवशी बाजूच्या दालनात मी बेवारशाप्रमाणे उभा होतो याचे मला स्मरण झाले. मोरोपंतानी प्रमुख अधिकाऱ्यांची व माझी मुद्दाम भेट घडवून आणली. शिवाजीचा सेनापती प्रतापराव गुजर हा मोहिमेत गुंतल्या कारणाने येथे नव्हता असे मला सांगण्यात आले. सेनापतीला पाहण्याची माझी उत्सुकता तशीच राहून गेली. परवाच्या दिवसाप्रमाणेच दरबारास सुरुवात झाली परंतु आज मी प्रमुख जागी असल्यामुळे मला सर्व काही नीट पाहता आले. हुजऱ्यांनी ललकाऱ्या देताच सर्वजण उठून उभे राहिले तोच सिंहासनाच्या मागच्या बाजूच्या दरवाज्याने शिवाजी महाराज पुढे आले. आसनाच्या समोर उभे राहून त्यांनी आसनाला मुजरा केला. मग आसनाकडे पाठ करून ते त्यावर बसले व हातावर भर देऊन त्यांनी अलगद पाय उचलून ते वर घेऊन मुडपले व पालथी मांडी घालून

आसनावर व्यवस्थित बसले. सिंहासन हे पवित्र मानून त्याला तळपाय लागू न देता असे बसण्याची हिंदूंची पूर्वापार प्रथा असल्याचे मला समजले. बसल्यावर त्यांनी सर्व सभेकडे पाहून 'बसा, बसा' अशी उजव्या हाताने खूण केली, तेव्हा सर्व उभे असलेल्या लोकांनी त्यांना खाली वाकून तीन वेळा मुजरा केला व नंतर सर्वजण खाली बसले. इतरांप्रमाणेच मीही बिनचूक त्रिवार मुजरा करून सर्व रीतभात बरोबर सांभाळली.

दरबार सुरू होताना मोरोपंत पिंगळे यांनी प्रथम एक पत्रक वाचले. त्यात बहुधा कालच्या प्रकाराची सविस्तर माहिती होती. त्यानंतर राजाने मला पाचारण केले. "जॉर्ज रॉबिन्सन" असे स्पष्ट नाव उच्चारून त्याने मला पुढे बोलावले, मी अदबीने झुकून माझी पिस्तुले समोर धरली व म्हटले,

"एका गरीब शिपायाची ही आपणास नम्र भेट आहे. परवाच्या दिवशीच ही आपणास देण्याचे माझ्या मनात होते. परंतु तेव्हा ती मजकडे नव्हतीच. मी यापेक्षा दुसरे काय आपणास देऊ शकणार? आपण याचा स्वीकार करावा." जी भेट मला राजा देऊ इच्छीत होता ते रुमालाने झाकलेले तबक हाती धरून एक सेवक शेजारी उभा होता. परंतु ऐनवेळी चपळाईने मी माझीच भेट त्यांच्यासमोर धरल्यावर त्यांची गडबड उडाली. घाईघाईने आबाजी सोनदेव यांनी एक तबक घेऊन त्यात ती पिस्तुले ठेवली व ते तबक राजासमोर धरले. अशा वेळी उपचार म्हणून राजा केवळ तबकाला हात लावतो व नंतर ते तबक बाजूला केले जाते. परंतु आज पिस्तुले समोर येताच राजाने ती स्वतः उचलून घेतली. हाताळली, न्याहाळली. तो म्हणाला. "मीही एक शिपाई

आहे. एका शिपायाची दुसऱ्या शिपायाला याहून अधिक उत्कृष्ट अशी दुसरी कोणतीच भेट असू शकणार नाही. " त्याने पिस्तुलांच्या कारागिरीची तारीफ करून म्हटले, " खरोखर हिऱ्यामोत्यांच्या बहुमोल अलंकारापेक्षाही ही अगदी अचूक आणि बहुमोल भेट आहे. मला फार फार संतोष झाला. " असे म्हणत त्याने पिस्तुले परत तबकात ठेवली आणि नंतर ते तबक बाजूला नेले गेले.

त्यानंतर हुजऱ्याने राजापुढे रुमालाने झाकलेले एक तबक पुढे केले. त्याला राजाने हात लावल्यावर ते तबक माझ्या हाती देण्यात आले व हुजऱ्याने त्यावरचा रुमाल बाजूला केला. माझ्या पोषाखाची वस्त्रे आणि एक हजार सुवर्ण होन एवढे पारितोषिक त्या तबकात होते. दुसरे असेच एक तबक गोपाळालाही नजर केले गेले. त्यातही वस्त्रे आणि अडीचशे होन होते. एवढे झाल्यानंतर राजाने खूण करून तो करंडक मागवून घेतला व मला जवळ बोलावून त्याने स्वतःच तो माझ्या हाती दिला. तो म्हणाला. " ज्याच्याकरिता तू इथवर आलास ती तुझी वस्तू मी तुला आनंदाने परत देतो. तू मराठी राज्याकरिता एवढे काही केले आहेस की त्यापुढे तुझी एवढी साधी इच्छा नाकारणे म्हणजे अत्यंत क्षुद्रपणा आहे. त्याशिवाय ही माझी तुला व्यक्तिगत भेट. " राजाने आपल्या गळयांतील टपोऱ्या मोत्यांची एक माळ काढली व ती स्वतःच्या हाताने माझ्या गळयात घातली. मी भारावून गेलो होतो. " महाराज ! आपली फार फार कृपा झाली. हे सारं देऊन आपण मला लाजवले आहे " मी कसाबसा म्हणालो.

थोडा वेळ गेल्यानंतर राजा म्हणाला, " तरुण मित्रा ! तू तुझ्या

स्वत:करिता काहीच मागितले नाहीस. तुझी कोणतीही इच्छा सांग ! ती पूर्ण करण्यात मला फार फार आनंद वाटेल. " मला खरोखरी काहीही नको होतें मुख्य तो करंडक मिळाला होता. आता इतर कोणत्याही गोष्टीची मला मातब्बरी नव्हती. " महाराज माझ्या काहीही अपेक्षा आता शिल्लक उरल्या नाहीत. आपण सर्वकाही आधीच दिलेले आहे. "

" तरी पण मित्रा ! जे दिले ते मी दिले. तू काहीतरी मागावेस आणि ते मी पूर्ण करावे असं मला फार वाटतं. बोल ! कोणतीही इच्छा प्रकट कर ! " राजाने पुन्हा फार आग्रह धरला मला असाच ऐकलेला एक प्रसंग आठवला. डॉ. ब्रॉयटन या आमच्या कंपनीच्या डॉक्टरने शहाजहान बादशहाच्या मुलीवर उपचार करून तिला वाचवले तेव्हा काहीतरी मागून घेण्याकरिता बादशहाने पुन्हापुन्हा आग्रह केला. तेव्हा त्याने " जकात न घेता कंपनीच्या खुल्या व्यापाराला बंगाल सुभ्यात परवानगी असावी. " असे मागितले व बादशहानेही खुषीने ती मागणी पुरी केली. ते आठवले आणि मी म्हटले, " महाराज, आम्ही इंग्रज व्यापारासाठी येथे आलो. तुमच्याही राज्यात आमच्या व्यापाराची काही अधिक वाढ व्हावी यापेक्षा मी अधिक काय मागणार !" राजाने तें तत्काळ मान्य केले. " होय ! बळकट व्यापाराने राज्याला समृद्धी यते. हरतऱ्हेच्या वस्तू माझ्याही प्रजेच्या जीवनात असाव्यात अशीच माझी इच्छा आहे. तुम्ही आनंदाने येथे व्यापार करावा. तुम्हाला योग्य त्या सवलती मी निश्चितपणे देईन. या बाबतीत तुमच्या कंपनीचा प्रतिनिधी जर कोणी रायगडावर येऊन भेटेल तर त्याचे मी स्वागत करीन. त्याच्याशी योग्य ती बोलणी जरूर करीन."

मी राजाचे आभार मानून त्याचा निरोप घेतला. राजाने आणखी तीन चार दिवस थांबण्याचा मला आग्रह केला. पण मी ते नाकारले. माझ्या

डोळ्यांसमोर माझ्या मामांचे आणि जेनीचे चित्र उभे राहिले. त्यांची तीव्रतेने आठवण झाली. त्यांच्या आधीच्याच झालेल्या आघातात मी पळून जाऊन अधिकच भर टाकली होती. सुरत सोडल्याला आता वीस दिवस होत आले होते. त्या दोघांची किती करुणाजनक अवस्था झाली असेल हे लक्षात आणून मी व्याकुळलो. आणि राजाला म्हटले. " मी तृप्त झालो आहे ! आता मला जाऊ द्या. ज्यांच्याकरिता मी एवढे साहस केले ते माझे एकाकी नातलग माझ्या वाटेकडे डोळे लावून बसले असतील. एक प्रकारे त्यांना फसवूनच मी इथं आलो आहे. तेव्हां लवकरात लवकर मला सुरतेला कसं पोहोचता येईल एवढाच विचार आता माझ्या मनाला व्यापून राहिला आहे. आपण तीन दिवसांची मुदत दिली ती उद्या संपते आहे. ती वाढवून देण्याऐवजी उद्याच मला येथून पाठवता आले तर त्यासारखी दुसरी कोणतीच मेहेरबानी नाही असे मी मानेन."

राजालाही ते पटले. क्षणभर त्याने विचार केला. मोरोपंतांच्याकडे काही विचारपूस केली. त्यांनी आणि आबाजी सोनदेव यांनी काही वाटाघाटी केल्या व राजाला सांगितले.

राजा मला म्हणाला, " ठीक आहे ! तुझ्या इच्छेप्रमाणेच होईल. उद्या तुम्हाला इथून कूच करता येईल. बंदरावर पोहोचल्यावर आमच्या होडीतून तुला कुलाब्याला नेऊ व तेथून तेज गतीच्या जहाजाने तुला सुरतेला पोहोचविण्याची व्यवस्था होईल. नदीवरच्या धक्क्यापर्यंत माझे प्रतिनिधी म्हणून आमचे मोरोपंत तुझ्याबरोबर येतील. तेथून प्रतापराव नाईक हे आमचे एक सरदार तुझ्या दिमतीला राहतील. कुलाब्यापर्यंत त्यांची जबाबदारी आहे. आणि पुढे कुलाब्याचे आमचे दर्यासारंग तुला सुरतेला पोहोचवतील. " राजाने माझ्याशी पुन्हा एकदा इंग्लिश पद्धतीने

हस्तांदोलन केले व माझा निरोप घेऊन तो दरबार सोडून आत जाण्यासाठी वळला.

राजाने दिलेली आमची आहेराची तबके झाकून घेऊन हुजरे तयारच होते. त्यांच्यासह आनंदाच्या बरसातीत मनसोक्त न्हातच मी आणि गोपाळा परतलो.

प्रकरण आठवे

## आनंदी आनंद

रायगडावरून परत फिरण्यासाठी आमची पावले आम्ही वळवली. आता आमचा थाट काय विचारावा ! शिवाजीचे दोन प्रधान मोरोपंत पिंगळे आणि आबाजी सोनदेव हे बरोबर येत होते. दुभाषी निराजी शेणवी हा होता. सहा शिपाई होते, त्यांच्या कमरेला तलवारी आणि पाठीवर ढाली लटकत होत्या. त्यांचा नायक प्रतापराव हा सर्वांच्या पुढे चालत होता. आम्ही निघाल्याची वर्दी राजाला पोहोचल्यावर राजा स्वतः येण्यास निघाला आहे, असा निरोप आला म्हणून आम्ही तेथेच थबकलो. तोच गंगासागर तलावाच्या कडेच्याच तटबंदीच्या दरवाज्यातून उतरून राजा आमच्याकडेच येत असलेला दिसला. एका शिपायाने त्याच्या शिरावर भलीमोठी छत्री धरली होती. राजाच्या बरोबरच अदबीने बोलत बोलत त्याचे चिटणीसही येत होते. त्याशिवाय आणखी फक्त दोनच हुजरे त्यांच्याबरोबर होते. एक सर्वात पुढे होता आणि दुसरा

राजाच्या मागून चालला होता. राजा जवळ येताच माझ्या बरोबरच्या सर्वांनीच वाकून त्याला मुजरे केले. मीही अदबी दाखविण्याकरिता झुकलो.

" महाराज ! निरोप देण्यासाठी आपण स्वतः इथं आलात, फार मोठी मेहेरबानी झाली आमच्यावर." मी अदबीने म्हटले.

" अरे ! मेहेरबानी कसली ? ते माझं कर्तव्यच आहे." राजाने माझे दोन्ही हात आपल्या हातात घेऊन मोकळेपणाने हसतहसतच मला उत्तर दिले, " माझ्या तरुण मित्रा ! तुझं विस्मरण मला कधीही होणार नाही. माझ्याविषयी तूही अशीच मित्रत्वाची भावना राखावीस अशी माझी तुला विनंती आहे."

" होय महाराज ! पहिल्यापासून तीच तर भावना घेऊन मी इथं आलो होतो. मी तर एक फिरंगी माणूस. या देशाला सर्वस्वी अपरिचित. माझ्या देशात परतल्यानंतरही अंतकाळापर्यंत या देशाच्या आठवणी मला सोबत देतील त्यातली ही स्मृती सदा अग्रभागीच राहील अशी माझी खात्री आहे." मी म्हणालो.

" नमस्ते ! तुझा प्रवास सुखाचा होवो." अशी शुभेच्छा व्यक्त करून राजाने आपल्या प्रधानांना पुढच्या एकंदर व्यवस्थेबद्दल काही काही सांगितले. प्रतापरावालाही सांगितले. राजा स्वतःच बोलत बोलत आमच्याबरोबर चालू लागला. हत्ती तलावाला वळसा घालून आम्ही महादरवाज्यापर्यंत आलो. दरवाज्यात उतरण्याकरिता खाली जाणाऱ्या पायऱ्या होत्या. राजा तेथेच थांबला. दरवाज्यावर भगवा झेंडा डोलत होता. खांद्यावर नंगी तलवार घेतलेले शिपाई बुरजावर पहाऱ्यासाठी होते तर दरवाज्यापर्यंत उतरलेल्या पायऱ्यांवर दोन्ही बाजूला सहा सहा याप्रमाणे बारा

शिपाई सशस्त्र उभे होते. आमचा लवाजमा तेथे पोहोचताच सर्व शिपायांनी पटापट खाली वाकून राजाला मुजरे केले. आम्ही पायऱ्या उतरून दरवाज्याकडे वळलो. मी मागे वळून वर पाहिले. राजा हात हालवून मला निरोप देत होता. मीही तसाच हात हलवून प्रत्युत्तर केले. गोपाळनेही खाली वाकून सलाम केल्याचे पाहताच राजाच्या चेहऱ्यावर हास्य झळकल्याचे मला दिसले. आमची पावले महादरवाज्याच्या उंबरठ्यावर पडताच मी पुन्हा मागे वळून पाहिले. परंतु वळण मध्ये आल्यामुळे राजा दृष्टीआड झाला होता.

आता आम्ही बाकीचे सर्वजण गड उतरू लागलो. उतारावरून उतरत उतरत लहान दरवाज्याच्या बाहेर आल्यावर वाट पुष्कळच रुंद व प्रशस्त झाली होती. पायऱ्यांचा मार्ग संपून डोंगराची नैसर्गिक चढणीउतरणीवरचीच ती वाट होती. दरवाज्याबाहेरच बारा उमदे घोडे जीन खोगीर चढवून तयार होते. आणि आश्चर्य म्हणजे आमची दोन्ही तट्टेही इतक्या दिवसानंतर आज आम्हाला दिसली. दुभाषाने मला सांगितले. " बंदरापर्यंत तुमचा पुढचा प्रवास घोडयांवरून होईल. तुमच्यासाठी घोडे तयार आहेतच. पण तुमची तट्टेही तुमच्याबरोबर नेण्याची सोय केलेली आहे. जहाजावरून अखेरपर्यंत तुमच्या इच्छेनुसार ती पोचवली जातील. तुम्हाला अडचण असली आणि गरज नसली तर ती आम्ही विकतही घेऊ. त्यांची किंमत तुम्हाला ताबडतोब मिळेल. तुमची इच्छा असेल तसे सांगा."

मी गोपाळाशी विचारविनिमय केला. आमची थेट सुरतेपर्यंत व्यवस्था झाल्यानंतर तट्टांची गरजच संपली होती. मग त्यांचे लोढणे निष्कारण बरोबर बाळगण्यात काय फायदा होता ? त्यातून सुरतेत ह्या प्रवासासाठी म्हणूनच आम्ही ती खरेदी केली होती. त्यांचे आमचे जन्माचे

लागेबांधे होते थोडेच ! आम्हाला गरज नव्हती आणि इथे ती कोणाच्याही उपयोगास येऊ शकली असती. तेव्हा ती इथेच देण्याचा आम्ही निर्णय घेतला. किमतीबद्दल घासाघीस करणे अथवा त्यांना फसविणे मला प्रशस्त वाटेना, म्हणून मी प्रामाणिकपणे सांगितले, " सुरतेतून या प्रवासाकरिता म्हणून तर ती आम्ही खरेदी केली. प्रत्येकाने चाळीस चाळीस रुपये आम्ही दिले आहेत; तेवढे आम्हाला मिळाले तरी पुरे आहेत. " त्यावर " ठीक आहे, " असे म्हणून आबाजी सोनदेवांनी ती तट्टे बाजूला घेण्यास नोकरांना सांगितले व आम्ही सर्वजण इतर घोडयांवर स्वार होऊन पुढचा मार्ग आक्रमण करू लागलो. ज्या मार्गाने मी आलो तो हा मार्ग नव्हता. महाड ह्या गावातून आम्ही आलो असल्याचे मला आठवत होते. रायगडाला वळसा घालून बहुधा तो रस्ता येत असावा. आता रायगडाला पाठीमागे ठेवून आम्ही समोरच खाली उतरत होतो.

आम्ही पायथ्याच्या वाडी या गावातून तसेच पुढे चालतो होतो. सुमारे तीन तासांवर घोडयावरून प्रवास केल्यानंतर एका नदी किनाऱ्याशी येऊन आम्ही थांबलो. ह्या नदीला काळ नदी असे नाव आहे. आणि गावाचे नाव " नागठणे " किंवा असेच काहीसे असावे असे मला स्मरते. येथे एका शिडाचे एक छोटेसे जहाज किनाऱ्यावर नांगरून उभे होते. शिवाजीचे दोन्ही प्रधान व निराजी शेणवी इथून परत जाणार होते. आणि प्रतापराव व सहा शिपाई जहाजातून आमच्याबरोबर येणार होते. आबाजी सोनदेवांनी काय व्यवस्था केली कोण जाणे ? पण अर्ध्या तासाच्या अवधीत एक थैली नाण्यांनी भरून त्यांनी आम्हाला दिली व रक्कम मोजून घेण्यास सांगितले. मी पाहिले तर सगळी आमची इंग्रजी छापाचीच नाणी

असलेले बरोबर ऐंशी रुपये होते. मी मनापासून धन्यवाद देऊन त्यांचे आभार मानले व त्यांचा निरोप घेऊन जहाजावर चढलो.

जहाज छोटेसेच—जेमतेम पंधरावीस माणसे वावरू शकतील एवढेच होते. या जहाजाला मराठे 'फत्तेमार' असे म्हणत. ते एक शिडाचेच होते. आम्ही प्रवाहाच्या दिशेने चालली होतो त्यामुळे शीड फुगून जहाज झपाटयाने चालले होते खरे, परंतु सायंकाळी नंतर भरती येऊ लागल्या-मुळे आमचा वेग बराच मंदावला आणि ऐन रात्रीच्या दुसऱ्या प्रहरात आम्ही भर समुद्रात असणाऱ्या "खांदेरी-कुलाबा" ह्या बेटाच्या किनाऱ्यास लागलो. आजुबाजूला गडद अंधार होता, त्यामुळे मला नीट पाहता आले नाही परंतु बेटाचा लहानसा घेर, त्याला असणारी अजस्त्र तटबंदी. त्यावर मधूनमधून डोके वर काढणाऱ्या तोफा आणि तटबंदी बाहेर जिकडेतिकडे मराठयांच्या लढाऊ नौका आणि गलबते यांची गर्दी पाहून सभोवारच्या प्रदेशाच्या संरक्षणासाठी मुदाम निर्माण केलेले ते एक आरमारी मोक्याचे नाके असले पाहिजे एवढे मात्र माझ्या लक्षात आल्या-वाचून राहिले नाही. आम्ही बंदरावर उतरून आत गेलो. एका चांगल्या प्रशस्त हवेलीत प्रतापरावाने आमची सोय लावली. आम्हांला जेवणही व्यवस्थित मिळाले. आता आराम करा." तुमच्या सुरतेच्या जहाजाची तजवीज होताच पुढचा बेत ठरवू. कदाचित चार सहा दिवसही लागतील; कदाचित दोन दिवसात सुद्धा व्यवस्था होईल. पण तुम्ही कसलीच काळजी करू नका, मजेत राहा. मी आता उद्या सकाळी भेटेन" असे सांगुन तो निघून गेला. सर्व काही ऐषारामात चालल्यावर आम्हाला कसली काळजी करायचे कारण तरी काय असणार !

दुसऱ्या दिवशी सकाळी उठल्यावर मी बेटावर इकडेतिकडे हिंडून पाय

मोकळे करण्यासाठी निघालो. तटाच्या पायऱ्या चढून माथ्यावर आलो. सभोवार सगळा समुद्र, मागे पूर्वेच्या बाजूला किनारा त्याच्याच मागे दूरवर निळ्यानिळ्या डोंगरांच्या ओळीला भिडलेले क्षितिज किनाऱ्यावर ओळीने जाणाऱ्या नारळाच्या झाडीची वेलबुट्टी अशी पार्श्वभूमी, तर समोर उधाण आलेला दर्या, त्याच्या पृष्ठभागावर अनेक गलबते डोलत आहेत असे मोठे मोहक दृश्य दिसत होते. वायव्येला तर उत्तरेकडून मुरडून दर्यात आतवर घुसलेली किनाऱ्याची ओळच्या ओळ दिसत होती. तिच्याही टोकावर बांधीव तटबंदी होती. आणि तटावर एक ध्वज मला दिसला. त्याचा आकार आणि रंग मला ओळखीचा वाटला. आमचा ....आमचा इंग्रजी ध्वजच होता का तो ? केवढा आनंददायक धक्का होता तो ! खरेच का तो आपला ध्वज आहे ? मी न्याहाळून पुन्हापुन्हा पाहत राहिलो. सुमारे तीन मैलांचे मध्ये अंतर होते तरी तो ध्वज आमचाच आहे याविषयी मला खात्री वाटली. आणखी पाहिले तो इंग्लिश बांधणीची कांही गलबतेही मला दिसून आली, खात्रीने हे आमचेच कोठले तरी बळकट आश्रयस्थान असले पाहिजे. मी तिकडे जाण्यास अतिशय अधीर झालो. अतिशय उतावळेपणाने मी त्या बेटांविषयी चौकशी केली. तेव्हा तिथल्या शिपायाने सांगितले की "तो सगळा प्रदेश तुम्हा सुरतकर फिरंग्यांचाच आहे. त्याला 'मुंबाबाईची बेटं' म्हणून ओळखलं जातं" म्हणजे आमच्या बॉम्बेच्या इतक्या जवळ मी आलो होतो. सुरतेच्या दक्षिणेला सुमारे ऐंशी ते शंभर मैलांवर "बॉम्बा-इया" म्हणून एक द्वीपकल्प आमच्या इंग्रजांच्या ताब्यात आहे. पोर्तुगीजांनी लग्नातील भेट म्हणून ते चार्ल्स राजाला दिले व चार्ल्स राजाने तीन वर्षांपूर्वी ते कंपनीला देऊन टाकले होते. तेच हे "बॉम्बा-

हिया !" मला समोर दिसत होते. येथे व्यवस्थेकरिता एक गव्हर्नरही कंपनीने नेमलेला आहे. आणि मला आठवले की सुरतेचा हेन्री ऑक्सडनशी हल्ल्याच्या दिवशीच घाईघाईने येथेच आला होता. ते सगळं डोळ्यांनी पाहायला, त्या, साऱ्यांना समक्ष भेटायला मी अगदी उतावळा होऊन गेलो. प्रतापराव भेटताच मी म्हटले, " मला त्या बेटावर जाऊ द्या. इथं नाहीतरी एक दोन दिवस मोडणार आहेतच. तेवढ्या वेळात मी तिकडे जाऊन परत येतो. खात्रीने येईन. फसविणार नाही." पण प्रतापरावाने त्याला नकार दिला. तो म्हणाला, " तसे करता येणार नाही. तुमची जोखीम माझ्यावर आहे. तुम्हाला एक क्षणभर सुद्धा दृष्टीआड करून मला चालणार नाही. तुम्ही तिकडे गेलात तर धोका काहीच नाही हे मी जाणतो. पण मला तसे करता येणार नाही. ठपका माझ्यावर येईल. तुम्हाला सुरतेच्या गलबतावर चढवून वाटेला लावण्यापर्यंतची जबाबदारी माझ्यावर आहे. जीव गेला तरी ती मला टाळता येणार नाही. हां ! फार तर मी एवढे करू शकेन. तुमचा निरोप तिकडे पोचवीन. तिकडून कोणी तुम्हाला भेटायला आले तर भेटीची परवानगी देईन. तशी व्यवस्था करीन; पण तुम्हाला येथून हलता येणार नाही." मी म्हटले, " ठीक आहे. मी एक पत्र लिहून देतो. तेवढे तरी तिकडे नेऊन द्या. त्याचे काय होईल ते प्रथम पाहू." मी ताबडतोब पत्र लिहिले.

श्रीयुत गव्हर्नर अधिकारी, ' बॉम्बहिया बेट '

ईस्ट इंडिया कंपनी. पश्चिम विभाग, यासी,

मी जॉर्ज रॉबिन्सन, सुरतेचा एक युवक, काही खासगी कामाकरिता मराठ्यांची राजधानी रायगड येथे आलो होतो. ते काम फत्ते करून आता

परत सुरतेस जाण्यासाठी निघालो आहे. माझ्या थेटपर्यंतच्या प्रवासाची सर्व जोखीम मराठ्यांनीच पत्करली आहे. आज व आणखी दोन दिवस माझा मुक्काम या बेटावर आहे. आपल्या इतक्या निकट आल्यामुळे माझ्या देशबांधवांची भेट घेण्याची मला अनावर ओढ लागली आहे. परंतु योग्य त्या व्यवस्थेच्या काटेकोरपणामुळे मला हे बेट सोडता येणार नाही, हे आपण आणनाच. तर माझी आपणास विनंती आहे की आपणांपैकी कोणीही येथे येऊ शकले तर मला अतिशय आनंद होईल. अशा भेटीला इथल्या अधिकाऱ्यांची पूर्ण अनुमती असून तशी सर्व व्यवस्था करण्यासही ते उत्सुक आहेत. यात कोणत्याही प्रकारे धोका नाही अशी मी स्वतः खात्री देऊ शकतो. तरी आपणांपैकी कोणीही देशबंधु मला येथे येऊन भेटल्यास मी फार फार आनंदित होईन. सुरतेच्या माझ्या परिचितांपैकी हेन्री ऑक्संडन याचे एक नाव मला स्मरते तो आता तिथे आहे किंवा नाही ते मला माहीत नाही तथापि त्याला सवड नसेल तर दुसऱ्या कोणीही येऊन भेटण्यास माझी हरकत नाही. नव्हे मी अगदी अधीर आहे. माझी उत्सुकता जाणून आपण काही योग्य ती उपाययोजना कराल अशी आशा बाळगतो. ”

पत्र मी लिहिले व ते वाचून दाखविले. दुभाषाने त्यातील शब्दन शब्द प्रतापरावांना सांगितल्यावर एका छोट्या होडीतून पाचजण ते पत्र बरोबर घेऊन निघाले. होडीला पांढरे चौकोनी निशाण फडफडत ठेवले होते. होडी आत आत जाऊ लागली. मी एकटक पाहत राहिलो होतो. सुमारे दीड तास होत आला. ती दिसेनाशी झाल्यानंतरच मी माघारी वळलो. आता नुसती प्रतीक्षाच करावयाची. दुपारी जेवण घेऊन लगेच मी तटाबाहेर येऊन वाट पाहू लागलो. अखेर चार–पाच तासांनंतर मला

दोन होडया परत येताना दिसू लागल्या. एक सकाळी गेलेली आमची होडी आणि दुसरी इंग्रजांची होडी. त्यात एक इंग्रज व चार इतर शिपाई दिसत होते. माणसे स्पष्ट ओळखता येऊ लागली. स्वतः हेन्री ऑक्सेंडनच आला असल्याचे पाहून मी अतिशय आनंदलो. किनाऱ्यावर येताच चटकन उडी मारून हेन्री माझ्याजवळ आला व मला जवळ ओढून घेऊन म्हणाला, ' हॅलो, जॉर्ज ! किती अनपेक्षित ही आपली पुनर्भेट. जितकी अनपेक्षित तितकीच आनंददायक. "

पुढे दोन तीन तास आम्ही गप्पा मारीत बसलो. मनमुराद बोललो. हेन्रीने सुचविले, " मुंबईतच तुला आम्ही अधिकृतपणे ताब्यात घेऊन सुरतेला पाठवतो आणि मराठयांची जोखीम संपली आहे असे मान्य करतो. मग काय हरकत आहे ? " प्रतापरावाला हे विचारताच खांदेरीच्या अधिकाऱ्याशी विचारविनिमय करून त्यानेही या गोष्टीस मान्यता दिली. " मात्र तुमच्या मुख्य अधिकाऱ्याचे सही शिक्क्याचे स्पष्ट मजकुराचे पत्र आम्हाला मिळायला हवे. तसेच या माणसानेही स्वदस्तुरचे याच आशयाचे एक पत्र लिहून द्यायला पाहिजे तरच ते आम्ही मान्य करू. " असे त्याने स्पष्ट सांगितले. त्यात काहीच अडचण नव्हती. तेव्हा गव्हर्नरचे पत्र घेऊन दुसऱ्या दिवशी येण्याचे कबूल करून हेन्रीने माझा निरोप घेतला व तो परतला.

दुसऱ्या दिवशी सकाळी दहा वाजण्याचे सुमारास बॉम्बहिया बेटाचे मुख्य गव्हर्नर जिराल्ड अँजीर यांचा शिक्का असलेले पत्र घेऊन हेन्री आला. पत्रात गव्हर्नर यांनी सर्व हकीगतीचा थोडक्यात आढावा घेऊन म्हटले होते, " जॉर्ज रॉबिन्सन आणि गोपाळ सूरजलाल यांची सुरतेपर्यंत पाठवणी करण्याचे ठरवून आपण तशी कार्यवाहीही केलीत हे आपल्या मोठेपणास उचितच झाले. परंतु या कामगिरीत आम्हालाही भाग

घेण्याची संधी आपण दिलीत तर ते आपला मोठेपणा आणखीनच वाढविणारे कृत्य होईल यात शंका नाही. तेव्हा या दोघांना सुरतेला पोचविण्याचे व अशा रितीने आपली जबाबदारी काहीशी हल्की केल्याचे समाधान आपण उदारपणाने आम्हाला मिळू द्यावे अशी आमची नम्र विनंती आहे. ही दोन्ही माणसे सुरतेस पोहोचल्यानंतर सुरतेचे आमचे मुख्य अधिकारी श्रीयुत जॉर्ज आक्संडन यांच्याकडून तशा आशयाचे पत्र आपणाकडे पाठविले जाईल अशी मी हमी घेतो. कंपनीने पुढे केलेला मैत्रीदर्शक हात आपण झिडकारून देणार नाही अशी आपल्या उदारचरितामुळे आम्हाला खात्री आहे." मीही माझे पत्र लिहिले. त्यात माझी योग्य ती सोय होत असल्याचे कळवून आजवर केलेल्या मदतीबद्दल राजाचे, प्रधानांचे आमच्या दिमतीस दिलेल्या सर्वांचे पुन्हा पुन्हा आभार मानले होते. कुलाबा बेटाचे किल्लेदार आणि प्रतापराव यांचाही वेगळा उल्लेख करावयास मी विसरलो नव्हतो.

ही सर्व तजवीज झाल्यावर मुळीच वेळ न गमावता हेन्रीने आणलेल्या होडीत आम्ही चढलो व सर्वांचा प्रेमाने निरोप घेऊन होडी मुंबाबाईच्या दिशेने मार्ग काटू लागली.

बॉम्बे बेटावरील किल्ल्यात मोकळेपणाने गप्पा मारीत असताना हेन्रीने माझी तारीफ करून म्हटले "जॉर्ज! तुला कल्पना नसेल पण तू कंपनीच्या हिताच्या दृष्टीने लाख मोलाची कामगिरी बजावली आहेस. तुलना करायचीच म्हटले तर डॉ. ब्रायटनच्या कामगिरीशीच ती करावी लागेल. अरे, हा शिवाजी म्हणजे एक जबरदस्त प्रकरण आहे. आज ना उद्या तो स्वतंत्र राजा म्हणून द्वाही फिरवून राज्य करणार त्याचा धाक आम्हा सर्वांनाच आहे. राजापुरच्या वखारीच्या बाबतीत आपणाला केवढी नामुष्की आणि त्याचा रोष पत्करावा लागला आहे हे तुला कदाचित माहिती नसेल. या साऱ्या पार्श्वभूमीवर तू वैयक्तिक

रीतीने राजाचा विश्वास आणि मैत्री मिळवू शकलास ही केवढी अभिमानाची गोष्ट आहे. तुझ्या कामगिरीची खास करून दखल घेतली पाहिजे असं मी माझ्या काकांना पुन्हा पुन्हा सांगेन. जर राजाकडे एखादे शिष्टमंडळ पाठवायचे ठरले तर त्यात तुझा समावेश करावा लागेल. तू अनमान करू नकोस." हेन्रीचे म्हणणे खरेच होते. माझ्या व्यक्तिगत वेडयावाकडया साहसाचे असे काही चांगले परिणाम होतील याची मला कल्पनाही नव्हती. योगायोगामुळे केवढी मोठी कामं अनपेक्षित रीतीने होऊन जातात.

पुढे यथावकाश मी कंपनीच्या 'एंजल डिव्हाइन' या गलबताने सुरतेत येऊन पोहोचलो. मामा आणि जेनी दोघेही डोळयांत प्राण आणून माझी प्रतीक्षा करीत होते. मी दिसताच मला कडकडून मिठी मारून मामा मला म्हणाले, "पोरा ! तू पुन्हा दिसलास यातच सारं आलं. अरे, केवढा घोर लावला होतास माझ्या जिवाला, खरंच सांगतो माझ्या करंडकाची तर आशा मी सोडली होती. पण तुझ्या जीविताचीही आशा सोडून दिली होती. गेला महिनाभर मी आणि जेनी दोघे धडपणे जेवलोही नाही. पण आज तू दिसलास पोट भरलं ! अगदी तुडुंब भरलं ! आता काऽऽही नको आहे ! तु सुद्धा आणखी कुठं जाऊ नकोस."

जरा स्वस्थता झाल्यावर मी मामांचा करंडक त्यांच्या हवाली केला. त्यांनी अधिरेपणाने तो उघडून भराभर सगळया वस्तू बाहेर काढल्या व त्यांकडे डोळे भरून पाहून घेतले. सारे काही जसेच्या तसे होते. काडीलाही धक्का लागला नव्हता. सगळया वस्तू दोन्ही हातांनी घट्ट कुरवाळत ते तसेच मूकपणाने उभे राहिले. त्यांनी डोळे मिटून घेतले

होते. मी पाहिले तो त्यांच्या गालांवरून अश्रू ओघळत होते. काही वेळाने त्यांनी डोळे उघडले व भरल्या आवाजात ते मला म्हणाले "जॉर्ज ! अरे मला म्हाताऱ्याला तू पुनर्जन्मच दिला आहेस. मी तुला काय देऊ ? जे जे माझं काही आहे ते ते सगळ तुझंच आहे." परिस्थितीचा ताण थोडा कमी करण्यासाठी मी म्हणालो, "मामा, हे पाहिलं का शिवाजी राजानं मला त्याची भेट म्हणून काय दिलं आहे ते ?" मी गळ्यात कॉलरच्या आत झाकलेली मोत्यांची माळ काढून त्यांच्यापुढे धरली. टपोरे मोती आणि खाली जडावाचे हिऱ्यांचे पदक पाहून जेनी तर हारखूनच गेली, "हाउ लव्हली." ती उद्गारली व हातात माळ घेऊन



ती कतीतरी वेळ पाहतच उभी राहिली. "जॉर्ज, तू आता याच्या

कांही करंडाबिरंडा करू नकोस बाबा ! घडलं तेवढं रामायण पुरे झालं." जेनी म्हणाली, "खरं आहे." मामाही उद्‌गारले. तीच संधी साधून मी धिटाईने पुढे म्हणालो, "छे ! छे ! तसला करंडक करण्याची मला बिलकुल इच्छा नाही. माझ्या मनात त्या माळेला योग्य अशी जागाही मला माहीत आहे. माझा चालता बोलताच करंडक आहे मामा ! तुमची परवानगी घेऊन ही माळ कुठं शोभेल ते मी दाखवू इच्छितो." असे म्हणत जेनीच्याच गळयावरून मी माळ पुढे धरली. जेनी एकदम बावचळली. मामा एकदम म्हणाले, "ओह ! हा करंडक होय ? चालेल मला. माझी काहीच हरकत नाही. पण तिलाच विचार. काय ग जेनी, तुला आहे का कबूल ?" "हे हो काय बाबा !" असे म्हणून खाली मान घालीत जेनी त्यांना बिलगलीच. तिला जवळ घेत थोपटून मामांनी माझ्याकडे पाहिले आणि दुसऱ्या हाताने मलाही त्यांनी जवळ ओढून घेतले. काही वेळाने ते बोलू लागले. माझा लुटलेला करंडक तू आणून दिलास खरा, पण त्याच्या बदल्यात ह्या करंडकाची लूट करतोस काय ?....पंचवीस वर्षांपूर्वी वेस्ले घरातली एक मुलगी तुझ्या बापाने काढून नेली. आता त्याचा मुलगा तू पुन्हा दुसरी मुलगी पळवतो आहेस. इतिहासाची पुनरावृत्ती होते ती अशी. पण आहे ! मला ही पुनरावृत्ती मंजूर आहे. पण जेनी ! तुझं काय ? तुला हे पसंत आहे काय ?"

मी जेनीकडे पाहिले. ती लाजून लालीलाल झाली होती. गळयात झगमगणारी मौक्तिक माळा आणि गालावर लाललाल गुलाब पुष्पं यांमुळे खरोखरच [illegible] त्याक्षणी, जेनी मला जगांतील शतकोटी स्त्रियांहूनही अधिक सुंदर आणि श्रेष्ठ दिसत होती.

काडीलाह.

कुरवाळत तें क्र

BVBK-04009